# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६ / आषाढ २, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---

### राज्यातील वीजनिर्मिती संच तांत्रिक कारणांमुळे बंद पडल्याने निर्माण झालेल्या वीज तुटवड्याबाबत

**(१) * ३७७०४ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उन्हाळयामुळे विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढलेली असताना महानिर्मितीच्या विविध औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांतील काही संच तांत्रिक बिघाडामुळे बंद पडल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील कोराडी वीजनिर्मिती प्रकल्पातील ६६० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक ८, नाशिक औष्णिक केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक ४ तसेच चंद्रपूर औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील ५०० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक ७ हे सर्व संच तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विजेची मागणी सुमारे २९ हजार मेगावॅटपेक्षा अधिक असताना वीजनिर्मिती संच बंद पडल्यामुळे राज्याच्या वीजपुरवठ्यावर ताण निर्माण झाला असून भविष्यात भारनियमन अथवा वीजटंचाईची समस्या निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वीज संच सत्वर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

माहे एप्रिल, २०२६ मध्ये महानिर्मिती कंपनीचे काही संच तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते.

(३) हे खरे नाही.

महावितरणची माहे एप्रिल, २०२६ महिन्यामध्ये वीजेची उच्चतम मागणी २७,३६७ मे.वॅ. इतकी नोंदली गेली आहे. सदर महिन्यामध्ये महानिर्मिती कंपनीचे काही औष्णिक वीज निर्मिती संच तांत्रिक कारणास्तव बंद पडल्याने वीजेची उपलब्धता काही कालावधीकरिता कमी झाली होती. परंतु सदर कमी झालेली वीजेची उपलब्धता ही महावितरणद्वारे कोयना जलविद्युत प्रकल्पामधून वीजनिर्मिती करुन व गरजेनुसार खुल्या बाजारातून वीज खरेदी करुन वीजेची मागणी पूर्ण करण्यात आलेली आहे.

तसेच, भविष्यातील वीजेच्या मागणीची पुर्तता करण्यासाठी महावितरणने दीर्घकालीन मागणी संसाधन पर्याप्तता योजना (Long term Distribution Resource Adequacy Plan) नुसार पुढील पाच वर्षांकरीता ४३,८७० मे.वॅ. वीज खरेदी करार करण्यात आलेले आहेत व ही वीज क्षमता टप्प्याटप्प्याने स्थापित होऊन वर्ष २०३१-३२ अखेर महावितरणची वीज निर्मिती स्थापित क्षमता ७८,५९१ मे.वॅ. इतकी होणार असून त्याद्वारे भविष्यातील वीजेची मागणी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) तांत्रिक कारणास्तव बंद पडलेले वरील नमूद संच प्राधान्याने दुरुस्ती करुन कार्यान्वित करण्यात आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अंमली पदार्थांची विक्री व सेवन मोठ्या प्रमाणात होत असल्याबाबत**

**(२) * ३२३७१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय देरकर (वणी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश सावंत (माहिम), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अमोल जावळे (रावेर), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.संग्राम जगताप (अहिल्यानगर शहर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई शहर व उपनगर तसेच, पालघर, सिंधुदुर्ग, पुणे, भिवंडी (जि.ठाणे), अहिल्यानगर, सोलापूर, वर्धा, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, जळगाव, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री व सेवन करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत विविध ठिकाणी टाकलेल्या धाडीत करोडो रुपये किंमतीचा ड्रग्जसाठा जप्त करुन ड्रग्ज माफियांना अटक केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विशेषत: मुंबई शहर व उपनगर परिसरातील रेल्वे स्थानके, औद्योगिक परिसर, उद्याने, कॉलेज व शाळा परिसर, बसस्टॉप अशा सार्वजनिक ठिकाणी तसेच ग्रामीण भागातही निर्जन जागी अंमली पदार्थांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील ड्रग्ज रॅकेट बाबतची माहिती ॲड परवीन सय्यद यांनी दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे सादर करुनही त्याबाबत कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले असून राज्यात व विशेषत: मुंबईतील अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर NDPS कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, वर्धा व लातूर जिल्ह्यामध्ये हायड्रोपोनिक गांजा या अंमली पदार्थांची तस्करी व विक्री वाढत असून सदर गांजाची लागवड बंद घरे, फ्लॅट्स व गोडाऊनमध्ये होत असून त्याच्या सेवनाने तरुणांच्या मानसिक व शारिरिक आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची सखोल चौकशी करुन अंमली पदार्थांचे आंतरराज्यीय तस्करी रॅकेट मधील सूत्रधारांवर तसेच विक्री व पुरवठा करणाऱ्यांना अटक करुन त्यांच्यावर विविध प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याबाबत तसेच शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी विशेष जनजागृती, समुपदेशन व प्रतिबंधात्मक मोहिम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यात माहे जानेवारी, २०२६ ते माहे एप्रिल, २०२६ पर्यंत अंमली पदार्थ जवळ बाळगल्या संदर्भात एकूण ११४२ गुन्हे दाखल केले असून त्यामध्ये १६२६ आरोपींना अटक करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्यांत एकूण अंदाजे रू.२५४.५३ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुद्ध ३१९९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) मुंबई शहर व उपनगर परिसरातील रेल्वे स्थानके, औद्योगिक परिसर, उद्याने, कॉलेज व शाळा परिसर, बसस्टॉप अशा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन व विक्री करणाऱ्यांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली असून त्याची सांख्यिकीय माहिती खालील प्रमाणे आहे.

| सन | विक्री करणारे दाखल गुन्हे | अटक आरोपी | सेवनार्थी दाखल गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|---|
| २०२६ मे अखेर | ५२८ | ६५५ | २८५५ | २४५९ |
| २०२५ | ११४१ | १४५४ | ६४८२ | ५३२३ |

(४) ॲड परवीन सय्यद यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी दिलेले लेखी निवेदन पुढील कार्यवाहीकरीता आर.सी.एफ पोलीस ठाणे यांना पाठविण्यात आलेले होते.

आर. सी. एफ. पोलीस ठाणे येथे एनडीपीएस ॲक्ट १९८५ अन्वये सन २०२५ ते माहे फेबुवारी, २०२६ या कालावधीत अंमली पदार्थ विक्रीकरीता जवळ बाळगल्याप्रकरणी व अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरोधात एकूण ८२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये एकूण ९५ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यात सुमारे १९ कि.ग्रॅ. वजनाचे रू.२५ कोटी रकमेचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

अवैध अंमली पदार्थाची विक्री, सेवन व व्यापारावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींनी शासनाकडे निवेदन सादर केली आहेत. सदर निवेदनाच्या अनुषंगांने उचित कार्यवाही करण्याबाबत पोलीस आयुक्त, मुंबई यांना सुचित करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नशामुक्ती जनजागृती अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी सह पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चस्तरीय समिती" गठीत करण्यास दि.२१.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(५) वर्धा व लातूर पोलीस जिल्हा घटकामध्ये हायड्रोपोनिक गांजा या अंमली पदार्थाच्या तस्करी/विक्रीबाबत गुन्हे दाखल नाहीत.

(६) राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) व पोलीस घटकांमार्फत एकूण रु.५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे संपूर्ण देशातून समूळ उच्चाटण करण्याच्या धोरणाच्या अनुषंगाने राज्याने "A Whole-of-Government Approach" विकसीत केलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाची ही मोहिम राज्यातील विविध विभागामध्ये समन्वय साधून गृह विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. त्याकरीता अवैध अंमली पदार्थांची शेती/लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालण्याबाबत व अंमली पदार्थाचा प्रसारावर आळा घालण्याकरीता व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राज्यामध्ये विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येत आहे.

शासनाच्या अंमली पदार्थ तस्करी/ विक्रीबाबतच्या "Zero Tolerance" धोरणानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक २२.०८.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये अंमली पदार्थाच्या गुन्ह्यामध्ये एन.डी.पी.एस.ॲक्ट अंतर्गत दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत.

मुंबई शहरात "ड्रग्ज फ्री मुंबई" अभियान राबवून अंमली पदार्थाचे सेवनाचे परिणांमाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम, सामुहिक शपथ कार्यक्रम, पथनाटय, आर्ट्स फेस्टीव्हल, मॅरेथॉनमध्ये सहभागी होवून, वाहन रॅली, बॅनर / हॅण्डबिल पत्रके वाटप करून, पोलीस ठाणे हद्दीतून रॅलीचे आयोजन करण्यात येते.

अंमली पदार्थ विक्रीचे अधिक गुन्हे असलेल्या परिसरांची "हॉटस्पॉट" म्हणून यादी तयार करून सदर हॉटस्पॉट परिसरात पोलिसांमार्फत साध्या वेशात पेट्रोलिंग (गस्त) करण्यात येते. तसेच, बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाणी आणि गुन्हे शाखेअंतर्गत विशेष मोहीम राबवून अंमली पदार्थ विक्रेत्यांवर, बाळगणाऱ्यावर व त्याचे सेवन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी बसेसमध्ये कुरिअर पार्सल सेवेच्या नावाने अवैध मालवाहतूक होत असल्याबाबत

**(३) * ३५४६५ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नाशिक, विदर्भ, मराठवाडा, पिंपरी-चिंचवड-पुणे तसेच गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व अन्य राज्यात खाजगी बसद्वारे प्रवासी वाहतूक करणाऱ्या लक्झरी बस मध्ये मोठ्या प्रमाणावर कुरिअर पार्सल सेवेच्या नावाने अवैध मालवाहतूक सुरू असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी बसमध्ये मालवाहतुकीला परवानगी नसतानाही पार्सल सेवेकडे आरटीओसह वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत असून सदर मालाची चढ-उतार भर रस्त्यात केली जात असल्यामुळे शहरात वाहतूक कोंडी निर्माण होऊन प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरात महामार्ग, रावेत, सांगवी, काळेवाडी, वाकड परिसरातील अनेक रस्त्यांवर प्रवासी आणि माल भरला अथवा उतरला जात असल्याने वाहतुकीचा खोळंबा होऊन वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर खाजगी बस मधून मालवाहतूक करणाऱ्या लक्झरी बसेसवर आरटीओच्या मोटर वाहन कायद्यानुसार प्रवासी वाहनातून बेकायदा मालवाहतूक केल्यास दंडात्मक व फौजदारी कारवाई करून चालक व मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच नियमानुसार दंड, वाहन जप्ती किंवा परवाना निलंबनाची कारवाई करण्याबाबत परिवहन विभागाच्या वतीने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, प्रवासी बसची रचना ठराविक वजनासाठी असल्याने अतिरिक्त मालामुळे ब्रेकिंग, सिस्टम टायर आणि सस्पेन्शनवर ताण येऊन अपघाताचा धोका वाढत असल्याने लांब पल्ल्याच्या मार्गावरील प्रवासी बस मधील नियमबाह्यरित्या होणाऱ्या मालवाहतुकीवर प्रतिबंध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत खाजगी प्रवासी बसेसची नियमितपणे तपासणी करण्यात येते. वायुवेग पथकांमार्फत मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्यानुषंगाने बनविलेल्या नियमांमधील तरतूदींचा भंग करणाऱ्या खाजगी बसेसवर नियमित कारवाई करण्यात येते.

वायुवेग पथकांमार्फत सन २०२५-२६ मध्ये मालवाहतूक करणाऱ्या खाजगी प्रवासी बसेस संवर्गातील ५७२८ दोषी वाहनांवर कारवाई केली असून एकूण रु. ४६१.७८ लक्ष इतका दंड वसुल केला आहे. तसेच दिनांक ०१.०४.२०२६ ते दिनांक ३१.०५.२०२६ पर्यंत १४५४ दोषी वाहनांवर कारवाई केली असून एकूण रु. ७८.१८ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नसल्याबाबत

**(४) * ३६९२६ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव किंवा परीक्षेच्या संधीमध्ये सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांना आता खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नसल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या नव्या धोरणामुळे आरक्षण अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता येणार असून गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणाऱ्या उमेदवारांना याचा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमपीएससी परीक्षांमध्ये राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून नियुक्ती दिल्याने निर्माण झालेला वाद आणि न्यायालयीन याचिकांनंतर शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर हे धोरण निश्चित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्याबाबत

**(५) * ३२५३९ श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.महेश सावंत (माहिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्याचा निर्णय दिनांक ०१ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून चालकांना मराठी लिहिता व वाचता येते की नाही याची पडताळणी करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या किंवा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा व टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करुन चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) अंशत: खरे आहे.

(२) परवानाधारक ऑटोरिक्षा व टॅक्सीच्या अमराठी चालकांना व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अवगत करण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले आहेत.

रिक्षा/ टॅक्सी परवाना नूतनीकरण तसेच तपासणीदरम्यान परवानाधारकांना व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान नसल्याचे आढळून आल्यास अशा परवानाधारकांसाठी व्यवहारिक मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्याबाबत प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना सूचित करण्यात आले आहे.

(३) रिक्षा आणि टॅक्सीचे चुकीच्या पध्दतीने/अवैध कागदपत्रांच्या आधारे जारी करण्यात आलेले परवाने तपासणी करण्यासाठी संबंधित विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभाग, पोलीस विभाग व परिवहन

विभागामधील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिति स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. सदर समितीच्या अहवालानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात गोवंश तस्करीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(६) * ३४४६९ श्री.प्रविण तायडे (अचलपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.संग्राम जगताप (अहिल्यानगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागात गोवंश हत्या बंदी कायदा लागू असूनही अवैध गोवंश वाहतूक होत असल्याच्या घटना वारंवार घडत असून अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने पकडल्यानंतर ती पुन्हा त्याच गुन्ह्यात वापरली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोतस्करीला आळा घालण्यासाठी स्वयंप्रेरणेने गोरक्षणाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना अडचणींचा सामना करावा लागत असून गोतस्करीची माहिती देणाऱ्या गोरक्षकांचे जबाब नोंदविण्याऐवजी डमी व्यक्तींचे जबाब नोंदवून वाहने सोडण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात उघडपणे गोवंशाच्या कुर्बानीचे ऑनलाईन पेमेंट स्वीकारुन बुकिंग घेणारी बेकायदेशीर जाहिरात मोबाईल क्रमांकासह प्रसारित होत असल्याचे आणि जनावरांच्या बाजारांमध्ये कसाई हे स्वतःला दलाल म्हणून नोंदवून कृषी उत्पन्न बाजार समितीचे परवाने मिळवून खरेदी केलेल्या गोवंशाची वाहतूक करण्यासाठी केवळ बाजार समितीच्या पावत्यांचा आधार घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत गोवंशांना खाजगी व्यक्तींकडून ई-टॅगचा गैरवापर करून गोवंशांची बनावट नोंदणी करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मकोका अंतर्गत संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह गोवंशाची अवैध वाहतूक, खरेदी-विक्री, परवाने रद्द करण्याबाबत किंवा त्याचे निकष अधिक कडक करण्यासह सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गोवंशांच्या ई-टॅग नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, बनावट ई-टॅग रोखणे आणि गोवंश तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी सर्वसमावेशक नियमावली तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील विविध भागात अवैध गोवंश वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने पकडल्यानंतर ती पुन्हा त्याच गुन्ह्यात वापरली जात असल्याच्या १७ घटना निदर्शनास आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

गोतस्करीला आळा घालण्यासाठी गोतस्करीची माहिती देणाऱ्या गोरक्षकांचे जबाब नोंदविण्यात येतात. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन हे संबंधित पोलीस ठाणेस जमा करण्यात येते. नमूद गुन्ह्यातील वाहने मा.न्यायालयाच्या आदेशाने सोडण्यात येतात.
(३) अशी बाब पोलीस घटक कार्यक्षेत्रात निदर्शनास आली नाही.
(४) ई-टॅगचा गैरवापर करुन गोवंशाच्या बनावट नोंदणी केल्या प्रकरणी संबंधित आरोपींविरूद्ध भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम तसेच, प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियमाच्या तरतूदींचा भंग केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

(५) गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाच्या दिनांक २१ मे, २०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती, कोल्हापूर व वर्धा जिल्ह्यात तरुणींचे अश्लील व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर प्रसारित केल्याबाबत

**(७) * ३२८४४ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजेश बकाने (देवळी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश विटेकर (पाथरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर आणि परतवाडा (जि.अमरावती) शहरात अल्पवयीन व तरुण मुलींचे लैंगिक शोषण करून व एका तरुणाने ७ वेगवेगळ्या तरुणींसोबतचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती प्रकरणात मुख्य संशयित आरोपी श्री.अयान अहमद तन्वीर याच्यासह श्री.तरबेज खान तस्लिम खान, श्री.मोहम्मद साद मोहम्मद सादिक यांना अटक केले असून तसेच अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून व्हिडिओ प्रसारित करणाऱ्या श्री.उजेर खान उर्फ उजेर खान इकबाल खान याच्याविरुध्द स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारतीय न्याय संहिता (BNS), माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा (POCSO) अंतर्गत कोणती कलमे आरोपींविरुद्ध लावण्यात आली आहेत व मुख्य आरोपीने अमरावती येथील भाड्याच्या खोलीत पीडितांवर अत्याचार केल्याच्या कबुलीनंतर तेथील भौतिक व तांत्रिक पुरावे संकलित करण्यात आले आहेत काय,
(४) तसेच, शिरोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील एका नामांकित शिक्षण संस्थेत शिकणाऱ्या तरुणीवर अत्याचार करून तिचे चित्रीकरण करुन व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल केल्याचा तसेच पीडितेव्यतिरिक्त आणखी ८ तरुणींचे आक्षेपार्ह व्हिडिओ बनविल्याचा प्रकारही निदर्शनास आल्यामुळे स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे उक्त गाव बंद ठेवले होते, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापीठातील क्रय-भांडार विभागात कार्यरत असलेल्या लिपिकाच्या मोबाईलवरून काही विद्यार्थिनींच्या मोबाईलवर अश्लील व्हिडीओ व फोटो पाठविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी राज्य सायबर विभाग, डिजिटल फॉरेन्सिक प्रयोगशाळा व सोशल मीडिया मॉनिटरिंग यंत्रणेची मदत घेऊन संबंधित डिजिटल प्लॅटफॉर्मकडून माहिती मागविण्यासह सोशल मीडियावर व्हिडिओ

पसरल्यामुळे पीडितांच्या गोपनीयतेला बाधा पोहोचत असल्याने त्यांची ओळख पूर्णपणे गुप्त राखण्यासाठी तसेच त्यांना वैद्यकीय उपचार, मानसोपचार समुपदेशन, कायदेशीर मदत व पोलीस संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती विशेष यंत्रणा कार्यान्वित केली आहे,

(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने विशेष तपास पथक (SIT) गठीत करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी राज्यातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरामध्ये मुलींच्या सुरक्षिततेसाठी "सायबर जागरूकता", 'दामिनी पथक' गस्त आणि डिजिटल सुरक्षिततेसंदर्भात प्रशिक्षण देण्याकरिता विशेष मोहीम राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस स्टेशन परतवाडा हद्दीत एका १९ वर्षीय तरुणाने ७ ते ८ मुलींचे अश्लील व्हिडीओ, फोटो सोशल मिडीयावर व्हायरल केल्याबाबत परतवाडा पोलीस स्टेशन येथे दि.१३.०४.२०२६ रोजी अप.क्र. २९१/२०२६, भारतीय न्याय संहितेचे कलम २९४, ४५, २३८, ३(५), ७४ सह बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (पोक्सो ॲक्ट) कलम ८,१२,१७ व माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७, ६७(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर आरोपीस दि.१४.०४.२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) सदर गुन्ह्यात एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास जलद, सखोल, अचुक व पारदर्शक व्हावा याकरीता सहायक पोलीस अधीक्षक तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, अचलपूर उप विभाग यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत ८ अटक आरोपी हे न्यायालयीन कोठडीत असून त्यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात दि.१०.०६.२०२६ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) उपरोक्त नमूद गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम २९४, ४५, २३८, ३(५), ७४ सह बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (पोक्सो ॲक्ट) कलम ८,१२,१७ व माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७, ६७(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपींनी घटनेदरम्यान वापरलेले मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट, हार्डडिस्क आरोपींच्या कब्जातून जप्ती पंचनामा व घरझडती पंचनामा कार्यवाही दरम्यान जप्त करण्यात आलेले आहेत. सदर जप्त मुद्देमाल डिजीटल पुरावे तांत्रिक विश्लेषनाकरीता न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथे दाखल करण्यात आले आहेत.

(४) माहे ऑगस्ट, २०२४ ते माहे मार्च, २०२६ या दरम्यान शांतीनगर, ता.हातकणंगले येथे राहणाऱ्या २२ वर्षीय तक्रारदार तरुणीला तिचे फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी देवून तिला विविध हॉटेल मध्ये नेवून तिच्यासोबत इच्छेविरुद्ध जबरदस्तीने वारंवार शारिरीक संबध ठेवले. सबब, सदर तरुणीच्या तक्रारीवरुन दि.२६.०४.२०२६ रोजी हातकणंगले पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १७८/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४(२) (एम), ७५, ७६, ४९, ३५१ सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० चे कलम-६६(ई), ६७ (अ) प्रमाणे दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

सदर प्रकरणी पिडीत तरुणी व्यतिरीक्त इतर दोन महिलांचे आक्षेपार्ह फोटो आरोपीच्या मोबाईल मध्ये मिळून आले आहेत. सदर दोन पिडीत महिलांपैकी एका महिलेच्या तक्रारीवरुन शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२८७/२०२६ भारतीय दंड संहिता कलम ३५४ (अ), ३७६, ५०६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने दि.२८.०४.२०२६ रोजी स्थानिक नागरीकांनी शिरोली पुलाची गाव येथे अत्यावश्यक सेवा वगळून शांततेत बंद पाळला.

(५) महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापिठातील क्रय-भांडार विभागात लिपिक पदावर कार्यरत एका व्यक्तीने व्हॉट्सॲप क्रमांक हॅक झाल्यासंदर्भात दि.१५.०५.२०२६ रोजी NCCRP पोर्टलवर ऑनलाईन तक्रार केली होती.

सदर तक्रारदार व्यक्तीने एक apk file डाऊनलोड केल्याने त्याचा मोबाईल हॅक झाला व त्याच्या मोबाईलच्या संपर्कात असलेल्या अनेक लोकांना अश्लिल व्हिडीओ व फोटो असलेले apk file प्रसारीत झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(६) व (७) अमरावती अचलपूर-परतवाडा येथील गुन्ह्याचा तपास जलद, सखोल, अचुक व पारदर्शक व्हावा याकरीता सहायक पोलीस अधीक्षक तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, अचलपूर उप विभाग यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले आहे.

कोल्हापूर येथील उपरोक्त दोन्ही गुन्हे महिलांविषयी, गंभीर स्वरुपाचे व अती संवेदनशील असल्याने सदर गुन्ह्याच्या तपासाकरीता अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले आहे.

सोशल मिडीयाद्वारे काही अश्लील किंवा आक्षेपार्ह माहिती/ व्हिडीओ प्रसारण होवू नये याकरीता प्रसार माध्यमांना विशेष सूचना देवून वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. सोशल मिडीयाचा वापर करताना घ्यावयाच्या दक्षता बाबत शाळा/कॉलेज येथे डिजिटल सुरक्षिततेसंदर्भात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

महिला व मुलींवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांमार्फत गस्त घालण्यात येते, यांतर्गत निर्भया व दामिनी पथक, पोलीस काका, पोलीस दीदी व बडी कॉप या उपाययोजना करण्यात येतात. तसेच, या पथकांमार्फत शाळा, महाविद्यालय व इतर ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन समुपदेशन, मार्गदर्शन करण्यात येते.

पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडित महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरीता सर्व पोलीस आयुक्तालय/पोलीस अधीक्षक व पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

महिला हेल्पलाईन क्रमांक १०३ व १०९१, इमर्जन्सी हेल्पलाईन क्रमांक ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना २४ x ७ मदत देण्यात येते.

अत्याचार पीडित महिला व बालकांना समुपदेशनाकरिता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(८) * ३३५८३ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सन २०२६-२०२७ पासून सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजीच्या शासन निर्णयामुळे विशेष शाळांमधील सुमारे दहा हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांगांच्या १९८ विशेष शाळांमध्ये एकूण दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून त्या शाळांमध्ये फिजिओथेरपी, स्पीचथेरपी, समुपदेशन यांसह विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शिक्षणाची व्यवस्था सर्वसामान्य शाळांमध्ये अशा सुविधा नसल्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विशेष शाळांमध्ये सेरेब्रल पाल्सी, मस्क्युलर डिस्ट्रॉफी, स्पायना बिफिडा, पोलिओसारख्या विविध आजारांनी ग्रस्त विद्यार्थ्यांना जिने चढण्यासाठी असलेले सहायक सर्वसामान्य शाळांमध्ये नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय बदलण्याबाबत शासनाने पुर्नविचार करण्यासह विद्यार्थ्यांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा व सहाय्यकांची नियुक्ती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम १६ व १७ मधील सर्वसमावेशी शिक्षणासंदर्भातील तरतूदी विचारात घेता विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अस्थिव्यंग प्रवर्गाच्या उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचे reasonable accomodation उपलब्ध असल्याची खातरजमा करुन सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रापासून नजीकच्या सर्वसाधारण शाळेत समायोजन करावे, असे जिल्हा कार्यालयांना दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.४१४०/२०२६ मधील दिनांक ०२ एप्रिल, २०२६ रोजीच्या आदेशान्वये सदर पत्राला स्थगिती देण्यात आलेली आहे.

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशांस अनुसरुन अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणतीही एकतर्फी कार्यवाही करण्यात येत नाही.

दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसमावेशी शिक्षण उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने नियोजन आराखडा निश्चित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळात ई-बस पुरवठा व चार्जिंग स्टेशन उभारणीबाबत

**(९) * ३५९४२ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यातील बसगाड्यांचे टप्प्याटप्प्याने विद्युतीकरण करून सन २०३५ पर्यंत सर्व बस ई-बसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले असून त्याअंतर्गत भाडेतत्त्वावर ५१५० ई-बस घेण्याचा तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर राज्यभरात सुमारे १७१ ते २०० उच्च क्षमतेची चार्जिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत ई-बस पुरवठा व चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी कोणत्या पुरवठादार/कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून करारानुसार बस पुरवठा व चार्जिंग स्टेशन उभारणीचे उद्दिष्ट काय होते, तसेच राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये व बसस्थानकांवर चार्जिंग स्टेशन प्रस्तावित आहेत,
(३) असल्यास, करारानुसार अपेक्षित प्रमाणात ई-बसचा पुरवठा न झाल्याने तसेच चार्जिंग स्टेशन उभारणीच्या कामात विलंब झाल्याने अपेक्षित उद्दिष्टांच्या तुलनेत अत्यल्प बस उपलब्ध झाल्या असून केवळ मर्यादित ठिकाणीच चार्जिंग स्टेशनची उभारणी पूर्ण झाली असल्याने महामंडळास आर्थिक व कार्यात्मक नुकसान सहन करावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागा चार्जिंग स्टेशन व इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी खाजगी विकासकांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून या प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, महामंडळाच्या मालमत्तेचे संरक्षण करणे व महसूल हितसंबंध सुरक्षित ठेवणे याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने संबंधित पुरवठादार/कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यासह राज्यातील ग्रामीण, दुर्गम तसेच पुण्यासह प्रमुख शहरी भागांमध्ये ई-बस व ई-वाहनांसाठी आवश्यक वीजपुरवठा, चार्जिंग सुविधा, तांत्रिक मनुष्यबळ, देखभाल यंत्रणा व सार्वजनिक चार्जिंग नेटवर्क उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) रा.प. महामंडळात ई-बस पुरवठा व चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी घेणेकरीता मे. ईव्ही ट्रान्स (एमएसआर) प्रा.लि. या कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. करारातील तरतुदीनुसार २४ महिने कालावधीत २१५ बसेस प्रतिमाह प्रमाणे बसेसचा पुरवठा करणेबाबत नमूद करण्यात आले आहे. सदर बसेसच्या चालनाकरिता एकूण ३० विभागांत १७२ ठिकाणी चार्जिंग स्टेशनची निर्मिती प्रस्तावित आहे.
(३) होय.
(४) सदर प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागारांमार्फत सुसाध्यता अहवाल प्रक्रीया सुरु आहे. तद्नंतर सदर प्रकल्पाकरीता ऑनलाईन खुली ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(५) ई-बस पुरवठादार/कंत्राटदार यांनी विहीत कालावधीत बसेसचा पुरवठा न केल्याने संबंधित पुरवठादार/ कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. चार्जिंग स्टेशन उभारणीकरीता रा.प.महामंडळाने १७२ ठिकाणांपैकी ८७ ठिकाणी HT लाईन आणलेली आहे. सद्य:स्थितीत ३९ ठिकाणी चार्जिंग स्टेशन कार्यान्वित असून, ८५५ ई-बसेस रा.प.महामंडळास प्राप्त झालेल्या आहेत.

-----------------

## अजिंठा लेणी परिसरातील मधमाशांची पोळी हटविणेबाबत

**(१०) * ३६२२६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणी परिसरात माहे एप्रिल, २०२६ मध्ये मधमाशांचा हल्ला झाल्यामुळे ८२ पर्यटक जखमी झाले असून गेल्या दोन महिन्यांत अशा प्रकारची ही सहावी घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील मधमाशांच्या पोळया तातडीने हटवाव्यात किंवा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित कराव्यात, अशी मागणी पर्यटकांकडून सातत्याने होत असतानाही प्रशासनाने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केल्याने वारंवार हल्ल्यांच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन जागतिक वारसा स्थळाच्या पर्यटनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अजिंठा लेणी परिसरातील मधमाशांच्या पोळया सुरक्षितरित्या हटवून पर्यटकांच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे अंशत: खरे आहे.

अजिंठा लेणी हे केंद्र शासनांतर्गत संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्या अखत्यारीत येतात. तसेच, सदर स्मारक हे राखीव वनक्षेत्रात येते. सदर स्मारक परिसरात पर्यटकांवर मधमाशांचे हल्ले झाले असून काही लोकांना मधमाशा चावल्या असल्याचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांनी कळविले आहे.

वस्तुस्थितीमध्ये अशा तीन घटना गुफा परिसरात घडल्या असून तीन घटना आजूबाजूच्या वन क्षेत्रात घडल्या असल्याचे नमूद केले आहे.

(२) हे खरे नाही.

अजिंठा लेणी हे स्मारक राखीव वन क्षेत्रात असल्याने तसेच या लेणींमध्ये प्राचीन भित्तीचित्रे असल्यामुळे या ठिकाणी पारंपारिक पद्धतीने (अग्नीच्या धुराने) मधमाशांना पळवून लावणे शक्य होत नाही. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्या वन विभागाच्या समन्वयाने "मधमाशांचे बचाव व स्थलांतरण अभियान" वेळोवेळी राबविले जाते. तसेच स्मारक परिसरामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

मागील वर्षभरात करण्यात आलेल्या सक्रीय व प्रबळ कार्यवाहीच्या परिणामस्वरूप अशा घटनांमध्ये यावर्षी लक्षणीय घट झाली आहे. याशिवाय संभाव्य धोका टाळण्याकरिता वन विभागाकडून मधमाशांची पोळी प्राथमिक स्तरावरच निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्याकडून वेळोवेळी उपचारक उपाययोजना करण्यात आल्या असून मधमाशांच्या हल्ल्यामुळे पर्यटकांच्या संख्येमध्ये कोणत्याही प्रकारची घट नोंदविण्यात आली नसल्याचे कळते.

(४) अजिंठा लेणी हे राखीव वन क्षेत्रात स्थित असल्याने मधमाशांचे या ठिकाणी नैसर्गिक वास्तव्य असते, तरी देखील पर्यटकांच्या सुरक्षेकरिता भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्याकडून उपचारक उपाययोजना व मधमाशांचे शमन केले जाते. तसेच, वन विभागाच्या समन्वयाने "मधमाशांचे बचाव व स्थलांतरण अभियान" वेळोवेळी राबविले जाते.

सदर स्थळावर वैद्यकीय मदत आणि रुग्णवाहिकेची सुविधा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्यामार्फत उपलब्ध करून दिली जाते, तसेच खबरदारीचा उपाय म्हणून पर्यटकांना मधमाशांपासून संरक्षण देणाऱ्या टोप्याही पुरवल्या जातात. मधमाशांशी संबंधित घटनांचा धोका कमी करण्यासाठी आणि पर्यटकांसाठी सुरक्षित वातावरणे सुनिश्चित करण्यासाठी पर्यटक व्यवस्थापन योजनेवर देखील संबंधितांकडून देखरेख ठेवली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या देखभालीसाठी सक्तीचे कायदे व यंत्रणा निर्माण करण्याबाबत

**(११) * ३८०४७ श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच देशभरात वृद्ध आई-वडिलांना मुलांकडून दुर्लक्षित केले जाण्याचे, त्यांना घराबाहेर काढण्याचे, आर्थिक व मानसिक छळ करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुटुंब व्यवस्थेतील बदल, शहरीकरण आणि बदलती जीवनशैली यामुळे ही समस्या अधिक गंभीर होत असून अलीकडेच तेलंगणा राज्यात "पॅरेंटल सपोर्ट बिल" आणण्याबाबत चर्चा सुरू असून त्यानुसार पालकांची काळजी न घेणाऱ्या मुलांविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करता येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची तक्रार खरी ठरल्यास संबंधितांच्या पगारातून कपात करून पालकांना आर्थिक मदत देण्याची तरतूद प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्रात सध्या "Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, २००७" अस्तित्वात असला तरी त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसून अनेक वृद्धांना या कायद्याची माहिती नसून तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया जटिल व वेळखाऊ असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यात वृद्ध पालकांचे संरक्षण, सन्मान आणि आर्थिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विद्यमान कायद्यामध्ये आवश्यक दुरुस्ती करून तक्रार निवारणासाठी सुलभ व जलद प्रणाली उभारून तसेच आवश्यक असल्यास नवीन कायदा/धोरण आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे अंशत: खरे आहे.

अशा स्वरुपाच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

तेलंगणा शासनाने नोकरी करणाऱ्या पाल्यांनी मातापित्याप्रती उत्तरदायित्व व देखभालीची जबाबदारी पार पाडावी याकरीता दि. २८.०४.२०२६ रोजी अधिनियम प्रसिध्द केला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या परिपोषण निर्वाह भत्त्याबाबत उपविभागीय अधिकारी (महसूल) तथा पिठासीन अधिकारी यांच्याकडे माहे मार्च, २०२६ अखेर एकूण ९७२२ प्रकरणे दाखल झाली होती, त्यापैकी ८१६० निकाली काढण्यात आली आहेत. यास्तव सदर अधिनियमान्वये संबंधित पिठासीन अधिकारी यांच्याकडून ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींबाबत विहित मुदतीत वेळोवेळी निपटारा करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नॅशनल इन्फॉर्मेटिक सेंटर प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याबाबत

**(१२) * ३४१७४ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल इन्फॉर्मेटिक सेंटर (NIC) प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे आरटीओ अंतर्गत वाहनचालकांनी दंड भरल्यानंतरही संबंधित खटले ऑनलाईन पद्धतीने निकाली निघत नसल्याचे दिनांक ८ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर प्रणालीतील तांत्रिक बिघाडाची कारणे काय आहेत व प्रणालीतील त्रुटींमुळे आरटीओ कार्यालयातील विविध कामे प्रलंबित असून वाहनचालक/वाहनमालकांना वारंवार कार्यालयात पाठपुरावा करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने वाहनचालकांनी दंड भरल्यानंतर संबंधित खटले तातडीने ऑनलाईन निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) वाहनचालकांनी वाहतूक नियमभंग प्रकरणांमध्ये निर्धारित दंडाची रक्कम यशस्वीरित्या भरलेली असतानाही, संबंधित खटले ऑनलाईन पद्धतीने निकाली निघत नसल्याचे दिनांक ०८.०५.२०२६ रोजी निदर्शनास आले होते.

राज्यात NextGen ई-चलन प्रणाली कार्यान्वित केल्यानंतर पूर्वीच्या प्रणालीपेक्षा तांत्रिक संरचनेत बदल झाले होते. या नवीन संरचनेसाठी स्वतंत्र सर्व्हर व पोर्टलवर नवीन एपीआय विकसित करून ते कार्यान्वित करण्यात आले होते.

वाहनचालकांनी भरलेला दंड शासकीय खात्यात यशस्वीरित्या जमा होत होता, तथापि, तांत्रिक अडचणीमुळे या जमा दंडाची माहिती ‘वाहन ४.०’ प्रणालीमध्ये परावर्तित/प्रतिबिंबित होत नव्हती. परिणामी, प्रणालीमध्ये चलन अद्याप प्रलंबित असल्याचे दर्शवित होते.

सदर तांत्रिक अडचण निदर्शनास आल्यानंतर, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी) मार्फत तांत्रिक त्रुटी सुधारण्याचे काम हाती घेण्यात आले होते. एनआयसी, पुणे यांनी दिलेल्या अधिकृत अभिप्रायानुसार, सदर तांत्रिक समस्येचे दिनांक १४.०५.२०२६ रोजी पूर्णतः निराकरण करण्यात आले असून ई-चलन व वाहन ४.० प्रणाली सध्या पूर्ण क्षमतेने व सुरळीतपणे कार्यरत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील विविध बँकांमध्ये बनावट सोने व वेअर हाऊस कागदपत्रे तारण ठेवून गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ३३६१५ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील मर्चंट बँक, पूर्णवादी बँक व कॅनरा बँक (बदनापूर शाखा) येथे वेअरहाऊसची बनावट कागदपत्रे व बनावट सोने तारण दाखवून सुमारे रुपये ३८ कोटी ७७ लाखांचा आणि कॅनरा बँकेतील कर्ज पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान सुवर्ण मूल्यमापक (Gold Valuer) व बँक अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहारात बँक अधिकारी, कर्मचारी व मुख्य सूत्रधार यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून या प्रकरणातील संशयित सुवर्ण मूल्यमापकाच्या घरातून सुमारे ४४ लाख रुपयांचे दोन प्लॉटची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत व गैरव्यवहारातील रक्कम खाजगी कर्ज फेडण्यासाठी वापरण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली असून काही मुख्य आरोपी अद्याप फरार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत (EOW) सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सदरील गैरव्यवहारामुळे ठेवीदारांचे झालेले आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी, संशयितांच्या मालमत्ता जप्त करून बँक नुकसान वसुलीसाठी व भविष्यात अशा प्रकारचे बँकिंग गैरव्यवहार व बनावट सुवर्ण मूल्यांकन टाळण्यासाठी, बँकिंग प्रणालीतील सुरक्षितता आणि देखरेखीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) (अ) जालना जिल्हयातील मोतीराम अग्रवाल जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत कर्ज वितरणासाठी पंचमुखी वेअरहाऊस मध्ये माल साठविल्याच्या बोगस पावत्या सादर करुन त्या आधारे कर्ज घेऊन त्या कर्जाचा भरणा न करता ५३,२४,४९,८४९ रुपयांची फसवणूक झाल्याने पोलीस ठाणे, चंदनझिरा जालना येथे दि.१५.०४.२०२६ रोजी गु.र.नं २२०/२०२६ भा.न्या.स.कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२), ३(५) सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण कायदा, १९९९ चे कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात ८,१५,७५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून निष्पन्न झालेल्या सर्व १२ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

वेअरहाऊस संबंधितांनी या प्रकरणी कर्ज घेण्यासाठी ज्या व्यक्तींच्या नावे शेतमाल वेअरहाऊस मध्ये असल्याचे दाखवले आहे त्या व्यक्ती शेतकरी नसून रोजगार करणाऱ्या, हमाल, ड्रायव्हर आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मुख्य आरोपीतांनी या व्यक्तींच्या नावे कर्ज वितरण झाल्यानंतर या रक्कमा त्याच दिवशी त्यांना पाहिजे असलेल्या इतर खात्यांमध्ये वळती केल्या आहेत.

अशाच प्रकारे आरोपीतांनी पूर्णवादी नागरीक सहकारी बँकेमध्ये देखील बनावट वेअरहाऊस पावत्या दाखल करुन कर्ज वितरण करुन घेतले आहे.

(ब) त्यानुषंगाने पूर्णवादी नागरीक सहकारी बँक, शाखा गांधी चमन, जुना जालना येथे कर्ज वितरणाकरिता वेअरहाऊस मध्ये माल साठविल्याच्या बोगस पावत्या सादर करुन कर्ज वितरीत करुन घेऊन बँकेची ८,१२,९३,६४० रक्कमेची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस ठाणे, कदीम जि.जालना येथे दि. २२.०४.२०२६ रोजी गु.र.नं.१६५/२०२६, भा.न्या.स. कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या सर्व ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(क) तसेच जालना जिल्हयातील मोतीराम अग्रवाल जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बॅंक, अंबड शाखेतील बँकचे अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करुन तारण ठेवलेल्या रु.९६,४१,६५० किंमतीच्या सोन्याचा अपहार करुन त्याजागी बनावट सोने ठेवून फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस ठाणे, अंबड येथे दि. ३०.०४.२०२६ रोजी गु.र.नं. २५६/२०२६ भा.न्या.सं. कलम ३१६(२), ३१६(४), ३१८(४), ३३८, ३३९, ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या सर्व ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(ड) तसेच जालना जिल्हयातील कॅनरा बँक, बदनापुर शाखेतील बँक अधिकारी व सुवर्ण मुल्यमापक यांनी संगनमताने बनावट सोने खरे असल्याचे भासवून त्यावर सोने तारण कर्ज मंजूर केले. तसेच बँकेतील खऱ्या सोन्याची चोरी करुन बँकेची फसवणूक केली. अशा प्रकारे बनावट सोन्याच्या आधारे कर्ज वितरण करुन व बँकेतील सोने चोरी करुन आरोपीतांनी बँकेची ७,३१,००,००० रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दि. २५.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे, बदनापुर येथे गु.र.नं. १८५/२०२६ भा. न्या. सं. कलम ३१६(५), ३१८(४), ३१६(२), ३०६, ६६८, ३३६(३), ३४०(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात २,०६,३४,७४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून निष्पन्न झालेल्या सर्व ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) कॅनरा बँक, बदनापुर शाखेतील बँक अधिकारी, कर्मचारी तसेच सुवर्ण मुल्यांकनकर्ता यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने सदरच्या गुन्ह्यांत मुख्य आरोपी श्री.संजय आसाराम डोंगरे, बँक अधिकारी याच्यासह एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

आरोपी श्री.प्रविण प्रभाकर बुऱ्हाडे, सुवर्ण मुल्यांकनकर्ता याने सदरच्या अपहाराच्या रकमेतून खरेदी केलेल्या ४४ लाख रुपयांचे शेतजमीनीचे कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

(३) सदर प्रकरणी उक्त प्रमाणे वेगवेगळे चार गुन्हे दाखल असून पोलीस ठाणे, चंदनझिरा येथील गु.र.नं २२०/२०२६ व पोलीस ठाणे, कदीम येथील गु.र.नं.१६५/२०२६ या दोन गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, जालना यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

पोलीस ठाणे, चंदनझिरा येथील गु.र.नं २२०/२०२६ या गुन्ह्यातील दोषी आढळलेल्या आरोपींना गुन्ह्यात अटक करुन त्यांच्याकडील ८,१५,७५,०००/-रुपये किंमतीची मालमत्ता गोठविण्यात आली असून महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संबंधाचे संरक्षण कायदा, १९९९ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदरचे गुन्हे तपासाधीन आहे.

बँकिंग प्रणालीवर भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे (RBI)नियंत्रण करण्यात येत असून ग्राहकांचे पैसे, डिजीटल व्यवहार आणि बँकिंग व्यवस्था सुरक्षित राहावी यासाठी RBI द्वारे वेळोवेळी नियम व मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात येतात. भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ने सोने तारण ठेऊन दिल्या जाणाऱ्या कर्जामध्ये आढळलेल्या अनियमिततेबाबत दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी परिपत्रक जारी केले आहे. यानुसार RBI ने सर्व संबंधित संस्थांना तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत.

पोलीस प्रशासनाकडून संबंधित गुन्ह्यातील मालमत्ता जप्तीबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त होताच, महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संबंधाचे संरक्षण कायदा,१९९९ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१४) * ३२४२९ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील अनेक जिल्हयात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून अहिल्यानगर जिल्ह्यात सायबर गुन्हेगारांनी ५१४१ नागरिकांची सुमारे रु.६६ कोटी २६ लाखांची फसवणूक केली असल्याचे दिनांक २४ मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोपरगाव (जि.अहिल्यानगर) येथे एका निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास डिजिटल अटकेची भीती दाखवून सुमारे रु.८७ लाख ३० हजारांची फसवणूक केली असून सदर प्रकरणी तक्रारींवर गुन्हा दाखल करण्यास विलंब करुन आरोपीस फसवणूक व पुरावा नष्ट करण्यास वाव दिल्याप्रकरणी तसेच मुख्यमंत्री कार्यालयास खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्यामुळे पोलीस निरीक्षक श्री.रामकृष्ण कुंभार यांच्यावर स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नवी मुंबईतील कळंबोली परिसरात राहणाऱ्या एका ६२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकास डिजिटल अटकेची भीती दाखवून त्यांच्याकडून रुपये १ कोटी ५४ लाख ९८ हजार इतकी व नागपूर शहरात सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून ८५ हून अधिक ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक झाल्याच्या ३३ घटनांची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, पुणे शहरातील नागरिकांची सायबर गुन्हेगारीच्या माध्यमातून नागरिकांचे रु.४५२ कोटी आणि महानगर नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL) चे गॅस कनेक्शन बंद करण्याची भीती दाखवून बनावट संदेश, लिंक व एपीके फाइल्सच्या माध्यमातून सुमारे रु.१९ लाख ५८ हजार ८४० इतकी व मुंबई शहरात रुपये १००० कोटी व नागपूर शहरात कोट्यवधी रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सायबर फसवणूक रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात सन २०२५ ते माहे मे, २०२६ पर्यंत सायबर आर्थिक फसवणूकी संदर्भात एकूण १०५०५ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यामध्ये एकूण २३७९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सन २०२५ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात नागरीकांची डिजिटल अटकेची भीती दाखवून, शेअर ट्रेडींग, होटेल रेटिंग व apk PDF फाईल्स इत्यादीच्या माध्यमातून सायबर फसवणूकी संदर्भात एकूण ५१४१ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामध्ये एकूण रु.३७.७६ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. सदर फसवणूकीमध्ये एकूण रु.७.०२ कोटी इतकी रक्कम होल्ड करण्यात आली आहे.

(२) दि.१२.०१.२०२६ ते १९.०१.२०२६ या कालावधीत कोपरगाव, (जि. अहिल्यानगर) येथे एका निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास डिजिटल अटकेची भीती दाखवून सुमारे रु.८७ लाख ३० हजारांची फसवणूक केल्या संदर्भात कोपरगाव शहर पोलीस स्टेशन, जि. अहिल्यानगर येथे दि.२०.०१.२०२६ रोजी गु.र.नं.२९/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३१६(२) सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (D) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपासात एका आरोपीस अटक करुन त्याच्या विरुद्ध दि.२९.०४.२०२६ रोजी मा.न्यायालयामध्ये दोषारोपत्र दाखल केले आहे.

सदर गुन्ह्यातील फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी रु.७८,६३,६९५/- इतकी रक्कम होल्ड करण्यात आली असून त्यापैकी रु.४२,१८,४६८/- इतकी रक्कम फिर्यादी यास मा.न्यायालयाच्या आदेशाने परत देण्यात आली आहे. तसेच फिर्यादी यांची उर्वरीत गोठविलेली रक्कम परत देण्याबाबत कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

कोपरगाव शहर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे प्राप्त झाले नाही.

(३) नवी मुंबईतील कळंबोली परिसरात राहणाऱ्या एका ६२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकास डिजिटल अटकेची भीती दाखवून त्यांच्या कडून रु.१ कोटी ५४ लाख ९८ हजार इतकी फसवणूक केल्या संदर्भात दि.०१.०४.२०२६ रोजी कंळबोली पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गु.र.क्र.१८/२०२६ भारतीय न्याय संहिताचे कलम २०४, ३१९(२), ३१८(४), ३३६(२), ३(५), ३३६(३), ३३८, ३४० (२), ३५१ (४) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपी अटक करण्यात आले असून सद्य:स्थितीत ३ आरोपी जामिनावर असून १ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दि.०९.०६.२०२६ रोजी दोषारोप सादर करण्यात आले आहे.

नागपूर शहरात माहे जानेवारी, २०२६ ते माहे मे, २०२६ पर्यंत सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून जेष्ठ नागरीकांची फसवणूक झाल्याबाबत एकूण ३० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) पुणे शहरात सायबर आर्थिक फसवणूकी संदर्भात माहे जानेवारी, २०२६ ते माहे मे, २०२६ पर्यंत एकूण ५३६ गुन्हे दाखल असून त्यामध्ये रु.२०० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

तसेच महानगर नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL) चे गॅस कनेक्शन बंद करण्याची भीती दाखवून बनावट संदेश, लिंक व एपीके फाइल्सच्या माध्यमातून केलेल्या आर्थिक फसवणूकी संदर्भात एकूण १७ गुन्हे नोंद असून त्यामध्ये एकूण रु.८८ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

मुंबई शहरामध्ये सन २०२५ मध्ये सायबर आर्थिक फसवणूकी संदर्भात ४८२५ गुन्हे दाखल असून १४१० आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यात एकूण रु.१०३१ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली असून त्यापैकी रु.११० कोटी इतकी रक्कम होल्ड करण्यात आली आहे.

तसेच नागपूर शहरामध्ये सन २०२५ मध्ये सायबर आर्थिक फसवणूकी संदर्भात १३६ गुन्हे दाखल असून ८३ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यात एकूण रु.८२ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली असून त्यापैकी रु.३ कोटी इतकी रक्कम होल्ड करण्यात आली आहे.

(५) राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प महापे, नवी मुंबई येथे कार्यान्वित केला आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या क्षमतेसह कार्यरत आहेत. तसेच सदर सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे येथे कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येते.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य सायबर कार्यालयाचे कामकाज अधिक प्रभावीपणे व व्यापक होण्याकरीता दि.२१.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सायबर कार्यालय थेट पोलीस महासंचालक यांच्या अधिनस्त आणण्यात आले आहे.

सायबर गुन्ह्यांचे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून "सायबर जनजागृती/सायबर शिक्षण" हा सर्वात प्रभावी व मूलभूत उपाय असल्याने नागरिकांना सतत व नियमित स्वरूपात जागरूक करण्याकरीता व्हॉट्सॲपच्या माध्यमातून राज्यव्यापी सायबर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० वर तात्काळ तक्रार दाखल करण्याबाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या विविध सोशल मिडीया अकांउटद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

तसेच Twitter, Instagram, Facebook, YouTube वर सायबर गुन्हयांसदर्भात नवीन Modus Operandi बाबत घ्यायच्या काळजी बाबतची जनजागृती करण्याकरीता विविध Advisory, Graphics तयार करून प्रसारीत केले जातात.

राज्यात २३ जिल्ह्यांमधील ३४ प्रमुख रेल्वे स्थानकांवरील ५९० डिजिटल स्क्रीनच्या माध्यमातून सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शक व्हिडिओ (Cyber Advisory Videos) प्रसारित करण्यात येत आहेत.

#CyberSafeMumbai अभियानाअंतर्गत मुंबई पोलीसांतर्फे सायबर जनजागृतीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच नामांकीत कलाकार, खेळाडू, अभिनेते यांचे सायबर जनजागृती बाबत व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारीत करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घाटकोपर परिसरात पोलीस पथकावर जमावाने केलेल्या हल्ल्याबाबत

**(१५) * ३२६७५ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर परिसरात अल्पवयीन मुलींशी गैरवर्तनाच्या अफवेवरून जमाव आक्रमक झाल्याने यातील संशयित आरोपीला ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर जमावाने हल्ला केल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात ३०/ ४० अनोळखी व्यक्तींचा सहभाग असून हल्ल्यात जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर उपचार करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, उक्त घटनेतील मोठ्या जमावातील आरोपींची ओळख पटविण्यासाठी व त्यांना अटक करण्यासाठी शासनामार्फत तांत्रिक साधने (CCTV, डिजिटल ट्रॅकिंग) उपयोगात आणली आहेत काय,

(४) असल्यास, जमावाकडून पोलिसांवर हल्ला होण्याच्या घटनांमध्ये वारंवार वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अशा घटनांना आळा घालण्यासाठी, पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाकडून कोणती विशेष उपाययोजना राबविण्यात आली आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय कामात अडथळा आणणे व पोलिसांवर हल्ला करण्यासंदर्भात आजमितीस नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांमध्ये (BNS अंतर्गत) संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. दि. २५.०४.२०२६ रोजी रात्री २२.१० वा. सुमारास डायल ११२ (मोबाईल टॅब) वरील प्राप्त संदेशानुसार पोलीस घटनास्थळी गेले असता, त्यांना मारहाण करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय.

(३) होय. घटनास्थळावर हजर असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी मोबाईल मध्ये केलेले घटनेचे व्हिडीओ चित्रीकरण पंचनामा करून ताब्यात घेण्यात आले. त्याचे विश्लेषण करून आरोपी निष्पन्न करण्यात आलेले आहेत.

(४) सदर घटनांना आळा घालण्यासाठी कायदा व सुव्यवस्था हाताळण्यासाठी पोलीस दलास नियमीतपणे जमाव नियंत्रण व आपत्कालीन प्रतिसाद याबाबत प्रशिक्षण देण्यात येते. कर्तव्य बजावत असताना जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार तातडीची वैद्यकीय मदत, उपचार खर्चाची भरपाई उपलब्ध करून देण्यात येते. पोलीसांवर हल्ला करणाऱ्या व्यक्तींविरूद्ध भारतीय न्याय संहितेतील तसेच इतर संबंधीत कायद्यातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(५) सदर प्रकरणी घाटकोपर पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ४४७/२०२५ कलम १३२, १२१(१), १२१(२), १२६(२), ११५(२), १८९(१), (२), १८९(३), १९०, १९१(१), १९१(२), १९५(१) भा.न्या.सं. (CCTNS NO ०५६१/२०२६) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, गुन्ह्यात ४ आरोपीतांना दि. २६/०४/२०२६ रोजी अटक करण्यात आली. पुढील तपास चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात 'ग्रीड सपोर्ट चार्ज' व वाढीव वीज विक्रीकर लागू केल्याबाबत

**(१६) * ३३१४४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वीज विक्रीवरील करात प्रति युनिट ९.१० पैशांची वाढ केली असून ही अतिरिक्त वसुली औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांकडून १ डिसेंबरपासून करण्यात येणार असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुफटॉप सोलर बसवून सौर ऊर्जेचा वापर करणाऱ्या उद्योगांवर 'ग्रीड सपोर्ट चार्ज' (Grid Support Charges) आणि 'टीओडी' (TOD) नियमांतील बदलांमुळे आर्थिक ताण वाढला असताना या नवीन करवाढीमुळे इतर उद्योगांसह व्यावसायिक ग्राहकांवरही अतिरिक्त बोजा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशात २८० गिगावॅट (GW) सौर ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य पूर्ण होईपर्यंत वीज वितरण कंपन्यांनी (Discom) कसलाही अधिभार लावू नये, अशा मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने जारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाचे उद्दिष्ट पूर्ण होण्याआधीच राज्यातील १० किलोवॅटपेक्षा जास्त क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी राज्य सरकार आणि महावितरणने ग्रीड सपोर्ट चार्जेससह विविध करांच्या नावाखाली वसुली सुरू केल्यामुळे राज्यातील सौर ऊर्जा क्षेत्र, उद्योग व त्यावर अवलंबून असणारे व्यवसाय कोंडीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महावितरणने माहे फेब्रुवारीपासून लागू केलेल्या या अधिभारामुळे सौर ऊर्जा प्रकल्पांची मागणी मोठ्या प्रमाणावर घटली असून, १० किलोवॅटपेक्षा अधिक वीज वापरणारे ग्राहक, मोठ्या सहकारी गृहरचना संस्था (Housing Societies) व बंगल्यांच्या सोसायट्यांना वाढीव वीज देयके येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर ग्राहकांवर केवळ माहे फेब्रुवारीपासूनच नव्हे तर सन २०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने (Retrospective Effect) या अधिभाराची वसुली करण्यात येत असल्याने वीज खर्च कमी करण्यासाठी बँकांकडून मोठी कर्ज काढून टेरेसवर उभारलेले सौर ऊर्जा प्रकल्प आता ग्राहकांसाठी 'पांढरा हत्ती' ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन 'ग्रीड सपोर्ट चार्ज' आणि वाढीव वीज विक्री कर तात्काळ रद्द करुन उद्योग व व्यावसायिकांना दिलासा देण्यासाठी आणि राज्यातील सौर ऊर्जा उपक्रमांना वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०४.११.२०२५ अनुसार प्रधानमंत्री कुसुम घटक-ब अभियानाकरिता निधी उपलब्ध होण्यासाठी सदर वाढ माहे जानेवारी, २०२६ च्या वीज देयकापासून लागू करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम,२००३ नुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर ठरविण्याचा अधिकार आहे. मा.आयोगाच्या नेट मीटरिंग विनियमांतील तरतुदीनुसार मा. आयोगाने सौर वापरकर्त्यांमुळे महावितरणच्या इतर ग्राहकांवर वाढणारा आर्थिक भार लक्षात घेऊन ग्रीड सपोर्ट चार्ज लागु केला आहे.

सौर ऊर्जा स्वस्त व दिवसा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने त्याचा फायदा ग्राहकांना देण्यासाठी मा. आयोगाने TOD वीज दराची पूर्नरचना केली आहे.

तसेच, वाढीव अतिरिक्त वीज विक्रीकराच्या माध्यमातून जमा होणारा निधी प्रधानमंत्री कूसूम घटक-ब योजनेंतर्गत आस्थापित करण्यात येणाऱ्या सौर कृषीपंपांकरीता वापरण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

मा. आयोगाच्या दिनांक २५ मार्च, २०२६ पासून महावितरणकडील सर्व वर्गवारीतील ग्राहकांसाठी सरासरी वीजदारात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२६-२७ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत घट मंजूर केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे नाही.

राज्यातील महावितरणच्या ३ कोटी १८ लाख ग्राहकांपैकी केवळ ४०,५७२ (०.१३%) ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

तसेच, २ कोटी ३८ लाख घरगुती ग्राहकांपैकी ७.१७ लाख ग्राहकांनी छतावरील सौर प्रकल्प बसविले असून, त्यापैकी केवळ १४,९५५ (२.०९%) ग्राहकांना ग्रीड सहाय्य आकार लागू झाला आहे. सर्व घरगुती ग्राहकांच्या तुलनेत हे प्रमाण केवळ ०.०६% आहे.

मा. आयोगाने आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०२९-३० या कालावधीत घरगुती वर्गवारीसाठी वीजदरात ३% ते १४% पर्यंत घट मंजूर केली असून, स्मार्ट मीटर धारक घरगुती ग्राहकांना सौर तासांमध्ये ८५ पैसे ते रु. १ प्रति युनिट सवलत मंजूर केली आहे. घरगुती ग्राहकांना उच्च मागणीच्या काळात कोणताही अतिरिक्त आकार लागू करण्यात आलेला नाही.

(६) हे खरे नाही.

ग्रीड सपोर्ट चार्ज वसुली पूर्वलक्षी प्रभावाने (Retrospective Effect) करण्यात आलेली नाही. मा. आयोगाने सार्वजनिक सल्लामसलत प्रक्रियेव्दारे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ नंतर स्थापित केलेल्या छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांना ग्रीड सपोर्ट चार्जची तरतूद आधीपासूनच अस्तित्वात होती.

मात्र मा. आयोगाच्या वीजदर आदेश प्र.क्र.३२२ of २०१९ मध्ये छतावरील सौर क्षमता २००० MW होई पर्यंत ग्रीड सपोर्ट चार्ज लागू न करण्याची तरतूद केली होती. तद्नंतर सन २०२३ मध्ये मा.आयोगाने सार्वजनिक सल्लामसलत प्रक्रीयेव्दारे नेट -मीटरिंग विनियम, २०१९ मध्ये सुधारणा करून उपरोक्त मर्यादा ५००० MW वाढविली. राज्यातील Roof Top Solar क्षमता ५६०० MW ओलांडल्यामुळे, दिनांक १ मार्च, २०२६ पासूनच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. त्यानुसार महावितरणने सदरचा चार्ज लागू केला आहे.

(७) व (८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, अत्याचार व धर्मांतर झाल्याबाबत

**(१७) * ३२४६६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.रणधीर सावरकर**

**(अकोला पूर्व), श्री.महेश सावंत (माहिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील वडाळा परिसरात असलेल्या एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, अत्याचार व धर्मांतर प्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात एकूण आठ महिलांनी पुढे येत लैंगिक शोषण, अश्लील शेरेबाजी, विनयभंग मानसिक छळ तसेच धार्मिक भावना दुखावल्याचे आरोप केल्याची माहितीही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात कंपनीच्या पुणे येथील मुख्य कार्यालयातील एचआर विभागाकडे पीडित महिलांनी वेळोवेळी ईमेलद्वारे तक्रारी नोंदवल्या होत्या तरीदेखील सदर तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप पीडित महिलांकडून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने विशेष तपास पथक (SIT) मार्फत सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह राज्यातील आयटी, बीपीओ व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि धर्मांतरासारख्या दबावात्मक प्रकारांना प्रतिबंध करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नाशिक शहरामधील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांचे विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न व धार्मिक भावना दुखावल्याची बाब निदर्शनास आली असून ८ महिला व १ पुरुष यांनी पुढे येऊन दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून यामध्ये आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणातील पीडित महिला कर्मचाऱ्याने आरोपीकडून होत असलेल्या त्रासाबाबत पुणे येथील कंपनीच्या मुख्य कार्यालयातील ऑपरेशन मॅनेजर यांच्याकडे तोंडी तक्रार करून देखील तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले असल्याने याबाबत दाखल गुन्ह्यात संबंधित ऑपरेशन मॅनेजर यांना आरोपी करून अटक करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत देवळाली कॅम्प पोलीस ठाणे व मुंबईनाका पोलीस ठाणे येथे दाखल एकूण ९ गुन्हयांच्या तपासाकरिता विशेष तपास पथक (SIT) गठीत करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर येथे एचएसआरपी नंबर प्लेट्स वितरणामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१८) * ३७५५० श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहनांसाठी अनिवार्य करण्यात आलेल्या ‘एचएसआरपी (High Security Registration Plate)’ नंबर प्लेट्स वितरण प्रक्रियेमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे बनावट नोंदी करून प्लेट्स विक्री केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात संबंधित कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी अधिकृत नोंदणी प्रणालीमध्ये नोंद न करता एचएसआरपी प्लेट्स विक्री केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात संबंधित खाजगी कंपनी, अधिकारी, कर्मचारी तसेच परिवहन विभागातील अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आढळून आला आहे काय,
(४) तसेच, एचएसआरपी प्रणालीमध्ये बनावट अथवा अनधिकृत नंबर प्लेट्स बसविल्यामुळे सार्वजनिक सुरक्षा, गुन्हे तपास व वाहन ट्रॅकिंग यंत्रणेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने एचएसआरपी वितरण प्रक्रियेचे विशेष लेखापरीक्षण (Audit), सॉफ्टवेअर तपासणी व सायबर फॉरेन्सिकसह कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) होय.
(३) राज्यातील दिनांक ०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांसाठी अनिवार्य करण्यात आलेल्या एचएसआरपी नंबर प्लेटस् वितरण प्रक्रियेमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे मे. एफटीए एचएसआरपी सोल्युशन प्रा.लि. या कंपनीचा कर्मचारी श्री. निलेश बबन तुपे यांनी अधिकृत वाहन नोंदणी प्रणालीमध्ये नोंद न करता एचएसआरपी नंबर प्लेटस् विक्री केल्याचे आढळून आले आहे. याबाबत सदर व्यक्तीविरुध्द सिडको, छत्रपती संभाजीनगर पोलीस ठाणे येथे दिनांक २७.०४.२०२६ रोजी गुन्हा क्रमांक २५६/२०२६, कलम ३०६ व ३१६ (४) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.
(५) एचएसआरपी नंबर प्लेटस् वितरणाबाबतची आदर्श कार्यप्रणाली जारी करण्यात आली असून एचएसआरपी नंबर प्लेटस् वितरणाबाबतचे नियंत्रण व निरीक्षण परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात महावितरण कंपनीचे विभाजन करून कृषी व बिगरकृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्याबाबत**

**(१९) * ३६४९१ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढते कर्ज, आर्थिक अडचणी व कामाचा वाढता बोजा लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) कंपनीचे विभाजन करून कृषी व बिगरकृषी ग्राहकांसाठी दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिगरकृषी ग्राहकांसाठी महावितरण कंपनीमार्फत औद्योगिक, व्यापारी, घरगुती व अन्य ग्राहकांना वीज वितरण करण्यात येणार असून कृषी ग्राहकांसाठी एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) ही स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यात येणार आहे, तसेच या कंपनीस सुरुवातीचे अडीच हजार कोटी रुपयांचे भांडवल उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीने घेतलेल्या सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्ज दायित्वासाठी शासन हमी देण्यात आली असून बिगरकृषी वितरण क्षेत्रातील कंपनीला शेअर बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तोट्यात असलेल्या कंपनीचे शेअर्स बाजारात आणल्यास भविष्यात कंपनीच्या अस्तित्वाबाबत व खाजगीकरणाबाबत व या दोन्ही कंपन्यांचा आर्थिक व्यवहार, वीज विक्री, उत्पन्न व खर्चाचा स्वतंत्र लेखाजोखा ठेवण्यासाठी शासनाने कोणती यंत्रणा निश्चित केली आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकरी, घरगुती व औद्योगिक ग्राहकांना स्थिर व अखंडित वीजपुरवठा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

मा. आयोगाने दि. ०५ जानेवारी, २०२२ च्या पत्राद्वारे, कलम ८६(२) अंतर्गत महावितरणच्या कामकाजाचा अभ्यास करून कामगिरी सुधारण्यासाठी कालमर्यादित योजना तयार करण्याचा सल्ला दिला होता आणि महावितरणच्या कारभारात दीर्घकालीन संरचनात्मक बदल सुचवण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्यास विनंती केली होती. त्यानंतर, दि. ३१ मार्च, २०२३ च्या मध्यावधी आढावा आदेशात, मा. आयोगाने महावितरणला कृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा पर्याय शोधण्याचे निर्देश दिले होते. तसेच, दि. २८ मार्च, २०२५ च्या बहुवर्षीय वीजदर आदेशात, मा. आयोगाने कृषी ग्राहकांच्या वीज पुरवठ्याची जबाबदारी आणि त्याचे ऊर्जा लेखापरीक्षण एका स्वतंत्र कंपनीकडे सोपवण्याची प्रक्रिया वेगवान करण्याचे निर्देश दिले.

त्याअनुषंगानेच, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ९९/ ऊर्जा-५ दिनांक २१ एप्रिल, २०२६ नुसार महावितरणची आर्थिक पुनर्रचना, कृषी व्यवसायाचे विभाजन (Agri Demerger) व महावितरण अकृषिक कंपनीचे सूचीकरण करण्यास मंजुरी दिली. तसेच, महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ मे, २०२६ रोजी महावितरणच्या पुनर्रचनेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पुनर्रचना आणि हस्तांतरण योजना, २०२६ (Transfer Scheme) अधिसूचित केली असून, ही योजना दि. १ एप्रिल, २०२६ पासून लागू करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

शासनाच्या हस्तांतरण योजना २०२६ अंतर्गत, महावितरणचा कृषी वीज वितरण/पुरवठा व्यवसाय विभाजित करून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनीची (MSEBHCL) उपकंपनी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड (MSAPL) कडे सोपवला आहे, यामुळे, सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड (MSAPL) कृषी ग्राहकांसाठी सर्व वैधानिक कर्तव्ये पार पाडेल. इतर ग्राहकांच्या वीज वितरणाची जवाबदारी महावितरणकडेच ठेवण्यात आली आहे.

तसेच, दिनांक २१ एप्रिल, २०२६ च्या शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२६/प्र.क्र. ९९/ऊर्जा-५ नुसार कृषी कंपनीच्या (एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) कार्यकारी भांडवलासाठी शासनाकडून सुमारे रु. २,५०० कोटी नवीन भांडवल / हमी स्वरूपात सहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

महावितरण कंपनीने घेतलेल्या सुमारे ३२,६७९ कोटी कर्जदायित्वाची शासनाकडून स्वीकृती करून ही कर्ज फेडण्यासाठी १५ वर्षाच्या मुदतीचे सरकारी रोखे जारी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, दिनांक २१ एप्रिल, २०२६ च्या शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२६/प्र.क्र. ९९/ऊर्जा-५ नुसार महावितरण कंपनीचे सूचीबद्धीकरण (Listing / IPO) करण्यास देखील मान्यता देण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी दि.०१.०४.२०२६ पासून लागू करण्यात आली आहे.

(४) शासनाच्या हस्तांतरण योजना २०२६ अंतर्गत, कृषी व्यवसाय विभाजनानंतर महावितरण अकृषिक व सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड (MSAPL) ह्या दोन्ही स्वतंत्र कंपनी निर्माण करून त्यांचा आर्थिक व्यवहार, वीज विक्री, उत्पन्न व खर्चाचा लेखाजोखा स्वतंत्र करण्यात आला आहे.

महावितरण आणि सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड (MSAPL) या दोन्हीही कंपन्या शासनाद्वारे जारी केलेल्या पुनर्रचना व हस्तांतरण योजना २०२६ अंतर्गत गठीत केलेल्या देखरेख समितीच्या मार्गदर्शनाखाली विद्युत अधिनियम २००३ आणि मा. आयोगाच्या विनियमांमधील तरतुदीनुसार कामकाज करून नफ्यात येण्यासाठी प्रयत्नशील असतील.

(५) महावितरण वीजपुरवठ्याची विश्वासार्हता, क्षमता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी वितरण जाळ्यांचे बळकटीकरण, फीडर विभाजन, रिंग मेन युनिट स्थापना आणि नियमित प्रतिबंधात्मक देखभाल यांसारख्या उपाययोजना राबवत आहे. तसेच, RDSS आणि DPDC योजनांद्वारे हानी कमी करणे व वितरण व्यवस्था अधिक सक्षम करणे यावर भर दिला जात आहे. वितरण व्यवस्था बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०), कृषी फीडर सौरकरण आणि पीएम-कुसुम अंतर्गत सौर पंपांची अंमलबजावणी करण्यात येत असून, या सर्व उपक्रमांद्वारे ग्राहकांना स्थिर, गुणवत्तापूर्ण आणि अखंडित वीजपुरवठा देण्याचे उद्दिष्ट साध्य केले जात आहे.

महावितरणने केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुढील १० वर्षांतील विजेची वाढती गरज भागवण्यासाठी ‘संसाधन पर्याप्तता आराखडा (Resource Adequacy Plan) तयार केला आहे. आर्थिक वर्ष २०३४-३५ पर्यंत संभाव्य ४३,४६९ मे.वॅ. विजेची मागणी लक्षात घेऊन, वीज नियामक आयोगाच्या मंजुरीने ३३,४८७ मे.वॅ. क्षमतेचे अतिरिक्त वीज खरेदी करार करण्यात आले आहेत. या नवीन करारांमुळे महावितरणची एकूण वीज खरेदी करार क्षमता आता ७८,५९१ मे.वॅ. वर पोहोचली असून यामुळे राज्याची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित होणार आहे. यामध्ये मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० (MSKVY २.०) अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा शास्वत व स्वस्त वीज पुरवठा करण्यासाठी १६ GW क्षमतेचे वीज खरेदी करार सुद्धा समाविष्ट आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अवजड वाहनांमुळे अपघाताचे प्रमाण वाढल्याबाबत

**(२०) * ३३८८५ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवजड वाहनांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून दिवसा जड वाहनांच्या प्रवेशावर आणि वाहतुकीवर कायदेशीर बंदी असतानाही, भरवस्तीत आणि वर्दळीच्या वेळेत डंपर व जड वाहने मुक्तपणे संचार करित असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मुलुंड परिसरात ‘संत तुकाराम महाराज मार्गावर’ सकाळी ८ च्या सुमारास डंपरच्या धडकेने श्री.रवींद्र राणे (७५) या वृद्ध पादचाऱ्याचा व पुण्यातील बिबवेवाडी–कोंढवा रस्त्यावर भरधाव टँकरच्या

धडकेत श्री.अनिल आल्हाट या हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील 'नो-एंट्री'च्या वेळेत जड वाहने शिरल्यामुळे होणारे अपघात रोखण्यासाठी सध्याची सी.सी.टी.व्ही. (CCTV) यंत्रणा पुरेशी नसल्याने मानवी हस्तक्षेप टाळून थेट सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांच्या माध्यमातून (ANPR तंत्रज्ञान) जड वाहनांवर दंड आकारण्याची कोणती स्वयंचलित प्रणाली (Automated System) कार्यरत आहे काय,

(४) असल्यास, शहरी भागात जड वाहनांना प्रवेश देणाऱ्या संबंधित वाहतूक पोलीस अधिकारी व नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन 'स्मार्ट सर्व्हिलन्स झोन' तयार करून संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह अवजड वाहनांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी विशेष तपास मोहीम, सी.सी.टी.व्ही. निरीक्षण, वेगमर्यादा नियंत्रण, वेळेची सक्ती, वाहतूक पोलिसांची वाढीव नियुक्ती करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबईतील मुलुंड परिसरात दि. २३.०३.२०२६ रोजी डंपर मागे घेत असताना वृध्द पादचाऱ्याचा मृत्यू झाल्या प्रकरणी पो. ठाणे, नवघर येथे गु.र.क्र. १५८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तर, पुण्यातील बिबवेवाडी-कोंढवा रस्त्यावर माहे एप्रिल, २०२६ मध्ये टँकरच्या धडकेत हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झालेला आहे. त्यानुषंगाने पो. ठाणे, मार्केट यार्ड येथे गु.र.क्र. ७६/२०२६ भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रांमध्ये व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शहरी भागांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आलेले आहेत.

मुंबईमध्ये आज रोजी १०४७७ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे कार्यन्वित असून, नव्याने ४९४१ सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच, पुणे शहरामध्ये २८८६ सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरू आहे.

शहरात प्रवेश बंदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कसुरदार अवजड वाहनांवर प्रचलीत वाहतूक कायदा व नियमांन्वये वाहतूक पोलीसांकडून ई-चलान प्रणालीद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) वाहतूक पोलीस अधिकारी यांच्याकडून शहरी भागात जड वाहनांना प्रवेश दिला जात नाही. तसेच, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायदा तरतुदींनुसार प्रकरणपरत्वे गुन्हे नोंद करुन कारवाई करण्यात येते.

(५) राज्यातील वाहतूकीचे नियमन करण्याच्या अनुषंगाने, आपत्कालीन परस्थितीमध्ये तात्काळ मदत पुरविण्यासह रस्त्यांवरील अपघात रोखण्याच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना करून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सी.सी. टी. व्ही कॅमेरे व ए. एन. पी. आर. कॅमेरे यांचा वापर करण्यात येते आहे. याशिवाय, कृत्रिम बुध्दिमत्तेच्या आधारे स्मार्ट सर्व्हिलन्स झोन तयार करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

त्यानुसार मुंबईमध्ये १५४१८, पुणे शहरामध्ये २८८६ तर, ठाणे शहरामध्ये ६०५१ सी.सी. टी. व्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरू आहे.

मुंबई, पुणे, नवी मुंबई अशा मोठया शहरांमध्ये तसेच जिल्ह्यातील मोठया शहरांच्या मध्यवर्ती ठिकाणी महत्वाच्या मार्गावर गर्दीच्या ठिकाणी ठराविक वेळेकरीता अवजड वाहनांना प्रवेश मनाई बाबत अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येते. तसेच वाहतूक पोलीसांकडून सी.सी. टी. व्ही च्या माध्यमातून दंडात्मक कारवाई करण्यात येते.

तसेच अपघात रोखण्यासाठी नियमित विशेष कारवाई मोहीमही राबविण्यात येते. त्यामध्ये नो इंन्ट्री, नो पार्किंग, लेन कटींग, रॉंग साईड ड्रायव्हींग, ओव्हरटेकिंग अशा वाहतूक अपघातास कारणीभूत होणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैधानिक विकास महामंडळांचे पुनर्गठन करून प्रादेशिक समतोल राखणेसह विदर्भाचा वाढता अनुशेष दूर करण्याबाबत

**(२१) * ३२९३२ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक विकासातील असमतोल दूर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळांचा कार्यकाळ दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी वा त्यादरम्यान संपुष्टात आल्यानंतर माहे एप्रिल-मे, २०२६ पर्यंत त्यांचे पुनर्गठन अथवा पुनर्स्थापना झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडळांच्या पुनर्गठनास झालेल्या विलंबामुळे मागास भागांच्या विकासासंबंधी धोरणात्मक निर्णय प्रक्रिया प्रभावित झाली असून निधीचे न्याय वाटप, विकास अनुशेष दूर करणे तसेच सिंचन, शेती, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, औद्योगिक गुंतवणूक व रोजगारनिर्मिती या क्षेत्रांतील प्रादेशिक समतोल साधण्याच्या उद्दिष्टांवर परिणाम होऊन विदर्भ व मराठवाड्यातील विकास अनुशेष अधिक वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भासाठी डॉक्टर श्री.विजय भाकरे मराठवाड्यासाठी श्री.अनिल रामोड यांची नियुक्ती करण्यात आली असून मंडळच अस्तित्वात नसल्यामुळे प्रशासकीय कारणास्तव दरवर्षी प्रत्येक मंडळाचा किमान तीन कोटींचा खर्च होत असून मंडळांचे पुनर्गठन प्रलंबित असतानाही त्यांची कार्यालये कार्यरत असून तेथील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दरवर्षी वेतन व प्रशासकीय खर्चापोटी लक्षणीय शासकीय निधी खर्च होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भ, मराठवाडा व इतर मागास भागांचा सर्वांगीण, नियोजनबद्ध व गतिमान विकास साधण्यासाठी तसेच संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये अपेक्षित प्रादेशिक समतोल निर्माण करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांचे तातडीने पुनर्गठन करून त्यांना आवश्यक अधिकार, निधी, प्रशासकीय स्वायत्तता प्रदान करणे व पुनर्गठन होईपर्यंत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचा योग्य वापर करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

१) विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाची मुदत दि.३०.०४.२०२० रोजी संपुष्टात आल्यानंतरही विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशात अनुशेषात वाढ होवू नये याकरीता सन २०२०-२१ पासून आजतागायत दि.०३.११.२०१४ चे परिपत्रक व दि.०४.०३.२०१५ चे शुध्दीपत्रक अन्वये मा.राज्यपाल महोदयांनी ठरवून दिलेल्या निधी वाटपाच्या सुत्राप्रमाणे विदर्भ- २३.०३%, मराठवाडा- १८.७५% व उर्वरित महाराष्ट्र- ५८.२३% या प्रमाणात विभाज्य निधी वाटप करण्यात आले आहे. सन २०२१-२२ ते २०२६-२७ या कालावधीत विदर्भ व मराठवाडा प्रदेशासाठी सरासरी २५.७६% व १८.८२% निधी वाटप झाला असून तो सुत्रापेक्षा किंचित अधिकच आहे.

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे, या कारणास्तव उद्योग विभागाने दि.१६ सप्टेंबर, २०१९ रोजी सामुहिक प्रोत्साहन योजना जाहिर केली. माहे जुलै, २०२० ते माहे डिसेंबर, २०२५ या कालावधीत विदर्भात १३४२७९८ व मराठवाडामध्ये ८१२३८२ इतक्या उद्यम नोंदणी घेतलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची निर्माती केली असून त्यामुळे विदर्भात ५७.८८ लक्ष व मराठवाडामध्ये ३९.१३ लक्ष इतक्या रोजगाराची निर्मिती झालेली आहे.

३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, अमृतकाल रस्ते विकास योजना व त्यानुषंगाने "विकसित महाराष्ट्र" साठी २०२९ पर्यंत निर्धारित केलेले उद्दिष्ट यास अनुसरुन शक्यतो प्रादेशिक समतोल साधण्यात येतो.

४) कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी नियोक्ते, कारखानदार व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांचे एकत्रित (पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे) मेळावे आयोजित करण्यात येतात. माहे एप्रिल, २०२५ ते माहे मार्च, २०२६ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर विभागात आयोजित करण्यात आलेल्या १४० रोजगार मेळाव्यांत ८६१७ उमेदवारांची तसेच अमरावती व नागपूर विभागात आयोजित करण्यात आलेल्या अनुक्रमे ९७ व १२५ रोजगार मेळाव्यांत अनुक्रमे ४७२८ व ७८३४ उमेदवारांची नोकरीसाठी प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

५) जलसंपदा विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, माहे मार्च, २०११ पर्यंत राज्यातील सर्व जिल्हयांचा सिंचनाचा आर्थिक अनुशेष दूर झाला आहे. तसेच विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचा अनुकमे ९४% व ९९% भौतिक अनुशेष दूर झाला आहे. सन २०२५ अखेर विदर्भातील ७,८४,७२० हे.रसतु अनुशेषापैंकी ७,४१,१८५ हेक्टर म्हणजेच ९४% भौतिक अनुशेष दूर झाला आहे. विदर्भात अकोला व बुलढाणा जिल्हयात अनुक्रमे १४,५३० हे. आणि २९,००५ हे. इतका अनुशेष शिल्लक आहे. तसेच मराठवाडा प्रदेशाच्या ४,३०,६४० हे.रसतु अनुशेषापैंकी ४,२४,४४२ हे.रसतु म्हणजेच ९९% अनुशेष दूर झाला आहे. मराठवाडयात केवळ हिंगोली जिल्ह्यात ६,१९८ हेक्टर इतका अनुशेष शिल्लक आहे. विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील शिल्लक अनुशेष माहे जून, २०२७ पर्यंत दूर करण्याचे नियोजन आहे.

६) ऊर्जा विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा व वाशिम या ४ जिल्ह्यात सन २०२३-२४ मध्ये ७५,१५३ ग्राहक, सन २०२४-२५ मध्ये ७६,५२३ ग्राहक व सन २०२५-२६ मध्ये (अद्यापपर्यंत) ५३,९०५ ग्राहकांना नवीन विद्यूत पुरवठा केला आहे. दि.११ डिसेंबर, २०२५ अखेर या ४ जिल्ह्यात पायाभूत सुविधा आवश्यक नसलेले १,५३९ ग्राहक व पायाभूत सुविधा आवश्यक असलेले १,३२६ ग्राहक याप्रमाणे एकूण २,८६५ ग्राहकांना विद्युत पुरवठा देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

७) शालेय शिक्षण विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, गेल्या पाच वर्षात मराठवाडा विभागासाठी २१.३३%, विदर्भ विभागांसाठी २२.२७% तरतूद खर्च करण्यात आली आहे. सदरचा खर्च हा नियमित वेतन व विद्यार्थी हिताच्या योजनांवर शाळा, कर्मचारी व विद्यार्थी संख्येच्या प्रमाणानुसार करण्यात आला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे सद्य:स्थितीत अस्तित्वात नाहीत. ती पुनर्गठित करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांमार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. विकास मंडळे अस्तित्वात नसल्यामुळे, संबंधित प्रशासकीय कार्यालयातील पदे व्यपगत केल्यास व भविष्यात केंद्र शासनाने विकास मंडळांचे पुनर्गठन करण्यास मंजूरी दिल्यास प्रशासकीय कार्यालयातील पदे पुनर्जिवित करुन पदभरती करुन कार्यालये पुन्हा सुरु करणे, यात कालापव्यय होण्याची शक्यता आहे. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळातील एकूण ५१ अस्थायी पदांच्या आकृतीबंध प्रस्तावास दि.१०.०४.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी सध्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांच्या तीनही कार्यालयांमधील एकूण १८ पदे (३५%) भरण्यात आली असून ३३ पदे (६५%) रिक्त आहेत. तिन्ही विकास मंडळाच्या कार्यालयांतील कार्यरत कर्मचाऱ्यांमार्फत अभिलेख अद्ययावत ठेवणे, विकास मंडळांना वितरित केलेल्या विशेष निधीच्या वापराबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र, लेखा परीक्षण आक्षेप व इतर अनुषंगिक प्रशासकीय कामकाज हाताळण्यात येते. तिन्ही विकास मंडळावर मागील ३ वर्षांमध्ये वेतन व भत्ते साठी सरासरी रु.३,०५,६८,५८७/-, वेतनेतर खर्चासाठी सरासरी रु.२५,९१,७३४/- असा एकूण रु.३,३१,६०,३२१/-इतका निधी खर्च झाला आहे.

(४) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांच्या दि.२८ ऑक्टोबर, २०२२, दि.१२ डिसेंबर, २०२२, दि.९ एप्रिल, २०२३, दि.२२ ऑगस्ट, २०२४ व दि.१० डिसेंबर, २०२५ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. तसेच तीनही विकास मंडळांचे पुनर्गठन करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांच्या स्तरावरुन केंद्र शासनास (गृह मंत्रालय) पुन:श्च विनंती करण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांचे सचिव यांना दि.०६.०५.२०२६ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर बाब केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

विकास मंडळांच्या प्रशासकीय कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून अ.क्र.(३) समोरील उत्तरात नमूद केलेले कामकाज हाताळण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अल्पवयीन मुलींसह महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(२२) * ३५५३४ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी),**

**श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ नुसार सन २०२५ दरम्यान महिलांवरील बलात्काराच्या ८,६४३ व सन २०२४ मधील ७,९४० घटना घडल्या असून महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अहवालानुसार सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये बालकांवरील अत्याचारात ५५५ ने वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या अहवालानुसार एकूण महिला अत्याचारात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून यावर्षी तब्बल ५० हजार गुन्ह्यांची नोंद झाली असून कोल्हापूर परिक्षेत्रात गेल्या दोन वर्षांत महिला अत्याचाराच्या २,१७८ व विनयभंगाच्या ४,१९८ घटना घडल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अहिल्यानगर जिल्ह्यात मागील चार वर्षात ७०० अल्पवयीन मुली अत्याचाराच्या बळी ठरल्या असून चालू वर्षाच्या सुरुवातीच्या दोन महिन्यातच हा आकडा ४० वर पोहोचल्याचे दिनांक १९ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बदलापूर येथील शाळकरी मुलींवरील अत्याचार तसेच पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथील चिमुरडीवर झालेला अत्याचार यांसारख्या घटनांमुळे राज्यात तीव्र संतापाची लाट उसळली असून, बालकांचे खून, अपहरण, लैंगिक अत्याचार आणि कौटुंबिक किंवा परिचितांकडूनच होणारे विनयभंग अशा प्रकरणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पीडितांना ठराविक कालमर्यादेत न्याय मिळवून देण्यासाठी राज्यात ‘शक्ती फौजदारी कायदा (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०’ ची तातडीने अंमलबजावणी करावी अशी राज्यातील नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह महिला व शाळकरी मुलींच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून महिला सुरक्षा कक्ष, दामिनी पथक, समुपदेशन केंद्रे, हेल्पलाईन, विशेष मोहिमा व घरगुती व परिचयातील व्यक्तींकडून होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासह महिला व बालकांवरील अत्याचाराचे खटले जलदगतीने (Fast Track) चालविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र विशेष न्यायालये आणि विशेष पोलीस पथके (SIT) स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ नुसार महिलांवरील बलात्काराच्या सन २०२५ मध्ये ८,६४३ एवढ्या घटना तर सन २०२४ मध्ये ७,९४० एवढ्या घटना घडल्या आहेत.

महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अहवालानुसार सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये बालकांवरील अत्याचारात ४८२ ने वाढ झालेली आहे.

(२) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) सन २०२४ चा अहवाल माहे एप्रिल, २०२६ मध्ये प्रकाशित झाला असून यामध्ये सन २०२४ ची आकडेवारी देण्यात आलेली आहे. सदर अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये एकूण महिला अत्याचारासंबंधी दाखल गुन्ह्यांची संख्या ४७, ९५४ इतकी असून दाखल गुन्ह्यांच्या संख्येनुसार महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तथापि, NCRB च्या मार्गदर्शक तत्वानुसार, दाखल गुन्ह्यांची जास्त संख्या

लोकसंख्येमुळे दिसून येते व गुन्हेगारीमध्ये वाढ झाल्याचे दर्शवित नाही; तर त्यामध्ये सुधारित पोलीस यंत्रणा, उत्तम e-FIR सुविधा आणि तक्रार नोंदविण्यासाठी महिलांमध्ये वाढलेली जागरूकता दिसून येते.

तसेच, कोल्हापूर परिक्षेत्रात सन २०२४ व सन २०२५ या गेल्या दोन वर्षांत महिला अत्याचाराच्या २३६२ व विनयभंगाच्या ४४८५ घटना घडल्या आहेत.

(३) अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२२ ते सन २०२५ या मागील चार वर्षात अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या ६४१ घटना घडल्या असून चालू वर्षात माहे जानेवारी ते माहे मार्च, २०२६ पर्यंत ४१ घटना घडल्या आहेत.

(४) राज्यात बालकांचे खून, अपहरण व लैंगिक अत्याचाराच्या घटना घडू नयेत म्हणून राज्य शासनामार्फत वेळोवेळी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात. तसेच, अशा प्रकारच्या घटना घडल्या तर याबाबत तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येते.

बदलापूर येथील शाळकरी मुलीवरील अत्याचार प्रकरणी पोलीस स्टेशन बदलापूर पश्चिम येथे गु.र.क्र. २२/२०२६ नुसार दि.२२.०१.२०२६ रोजी गुन्हा दाखल केला असून दि. २८.०२.२०२६ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच, पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुरडीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी पोलीस स्टेशन राजगड, येथे गु.र.क्र.१६९/२०२६ नुसार दि.०२.०५.२०२६ रोजी गुन्हा दाखल केला असून दि.१६.०५.२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) दिनांक १ जुलै, २०२४ पासून देशात भारतीय न्याय संहिता लागू झाल्याने भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता हे कायदे अधिक्रमित झाले आहेत. त्यानुषंगाने शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० मधील तरतुदींचा नवीन फौजदारी कायद्यांशी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी दि.२५.०६.२०२५ च्या शासन निर्णयान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारसीस अनुसरून आवश्यक राज्य सुधारणा करण्यात आल्या आहेत.

(६) राज्यात महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यानुषंगाने इतर अनुषंगिक कारवाई करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग हा स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आला आहे.

२) महिलांविषयीच्या गुन्हयांचा तपास करण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र पोलीस तपास पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

३) महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये एकूण ५१ भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे.

४) पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडित महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरीता सर्व पोलीस आयुक्तालय/पोलीस अधीक्षक तसेच, पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

५) महिला व मुलींवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांमार्फत गस्त घालण्यात येते, यांतर्गत निर्भया, दामिनी, पोलीस काका, पोलीस दीदी व बडी कॉप या उपाययोजना करण्यात येतात. तसेच, या पथकांमार्फत प्रत्यक्ष भेटी देऊन समुपदेशन, मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येते.

६) महिला हेल्पलाईन क्रमांक १०३ व १०९१, बालकांसाठी हेल्पलाईन क्रमांक १०९८, इमर्जन्सी हेल्पलाईन क्रमांक ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना व बालकांना २४ x ७ मदत देण्यात येते.

७) महिला व बाल विकास विभागाच्या वतीने अत्याचार पीडित महिला व बालकांना समुपदेशनाकरिता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

८) महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्याकरीता एकूण ५८ जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात आलेली आहे.

९) लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालकांना वित्तीय सहाय्य व कायदेशीर मदत देण्यासाठी मनोधैर्य योजना सुरु करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथील अल्पवयीन चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याबाबत

**(२३) * ३२३९८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.महेश सावंत (माहिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथील अल्पवयीन मुलीवर श्री.भीमराव कांबळे या ६५ वर्षीय व्यक्तीने अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आल्याची गंभीर बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे समाजाच्या सर्व स्तरांतील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला असून संबंधित आरोपींवर फास्ट ट्रॅक न्यायालयामार्फत जलदगतीने खटला चालवून कठोर फाशीची शिक्षा करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला व लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्हयांमध्ये दोषी ठरलेल्या आरोपींना पॅरोल किंवा तात्पुरता जामीन देण्यास संपूर्ण बंदी घालावी, अशी शिफारस राष्ट्रीय महिला आयोगाने केंद्र शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील महिला व बालक सुरक्षेच्या दृष्टीने ग्रामीण भागात पोलीस गस्त, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा, शाळा परिसर सुरक्षा व महिला संरक्षण उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सदर प्रकरणातील पीडित कुटुंबास आर्थिक मदत, मानसिक समुपदेशन व कायदेशीर सहाय्य देण्यासह भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी राज्यातील ग्रामीण भागामध्ये महिला व बालक सुरक्षा विशेष अभियान राबविणे, पोलीस

यंत्रणेची जबाबदारी निश्चित करणे व संवेदनशील भागांमध्ये विशेष सुरक्षा उपाययोजना करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नसरापूर (ता.भोर, जि.पुणे) येथील अल्पवयीन मुलीवर श्री.भीमराव कांबळे या ६५ वर्षीय व्यक्तीने अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याप्रकरणी राजगड पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं.१६९/२०२६ नुसार दिनांक ०२.०५.२०२६ रोजी कलम १३७(२), १०३, ६४, ६५(२), ७४, १४०(१), १४०(३) भा.न्या.सं. सह कलम ४, ६, ८, १२ पोक्सो अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीला दिनांक ०२.०५.२०२६ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक १४.०५.२०२६ रोजीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून आरोपीविरुद्ध दिनांक १६.०५.२०२६ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच, सदर प्रकरणाची फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी सुरू असून प्रकरणी विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) राष्ट्रीय महिला आयोगाच्या दिनांक ०८.०५.२०२६ रोजीच्या प्रेस नोट मध्ये महिला व लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेल्या आरोपींना पॅरोल किंवा तात्पुरता जामीन देण्यास संपूर्ण बंदी घालण्याबाबत केंद्र शासनास लवकरच शिफारस करण्यात येईल, असे नमूद केले आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी पीडित कुटुंबास मोफत समुपदेशन सेवा पुरविण्यात आली असून मनोधैर्य योजनेंतर्गत १० लाख रुपयांची आर्थिक मदत मंजुर करण्यात आलेली आहे.

राज्यात महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यानुषंगाने इतर अनुषंगिक कारवाई करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग हा स्वतंत्र विभाग कार्यरत करण्यात आला आहे.

२) महिलांविषयीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र पोलीस तपास पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

३) महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये एकूण ५१ भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे.

४) पोलीस स्टेशनमध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडित महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरीता सर्व पोलीस आयुक्तालय / पोलीस अधीक्षक तसेच, पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

५) महिला व मुलींवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांमार्फत गस्त घालण्यात येते, यांतर्गत निर्भया, दामिनी, पोलीस काका, पोलीस दीदी व बडी कॉप या उपाययोजना करण्यात येतात. तसेच, या पथकांमार्फत प्रत्यक्ष भेटी देऊन समुपदेशन, मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येते.

६) महिला हेल्पलाईन क्रमांक १०३ व १०९१, बालकांसाठी हेल्पलाईन क्रमांक १०९८, इमर्जन्सी हेल्पलाईन क्रमांक ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना व बालकांना २४ x ७ मदत देण्यात येते.

७) महिला व बाल विकास विभागाच्या वतीने अत्याचार पीडित महिला व बालकांना समुपदेशनाकरिता राज्यात १२४ महिला विशेष समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

८) लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालकांना वित्तीय सहाय्य व कायदेशीर मदत देण्यासाठी मनोधैर्य योजना सुरु करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलावंतांना देण्यात येणाऱ्या मासिक अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

**(२४) * ३२४६० श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अमोल पाटील (एरंडोल), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, जालना, लातूर, परभणी, बुलढाणा येथील विविध क्षेत्रातील वृध्द कलावंताना दरमहा देण्यात येणारे पाच हजार रुपये मानधन आधारकार्ड पडताळणी (केवाएसी) अभावी प्रलंबित असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला व नृत्य क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांना शासनामार्फत दरमहा आर्थिक मदत देण्याची योजना कार्यान्वित असून या योजनेंतर्गत वर्षभरात सुमारे ३४ हजार कलाकारांना दरमहा रुपये पाच हजार इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२४ मध्ये योजनेतील पूर्वीची श्रेणी पद्धत (अ, ब, क, ड) रद्द करून सर्व पात्र कलाकारांना सरसकट लाभ देण्याचा निर्णय घेतल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यांच्या अर्जांची छाननी जिल्हास्तरावर होत असताना पात्रतेच्या निकषांबाबत विसंगती व तक्रारी प्राप्त झाल्याने अनेक पात्र कलाकार लाभापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, लाभार्थ्यांना वेळेत अर्थसहाय्य वितरित करणे व त्याचे पात्रतेचे निकष अधिक सुलभ व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

राज्य शासनाने विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांचा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचे धोरण आहे. या धोरणानुसार राजर्षी शाहू महाराज-ज्येष्ठ कलावंत व साहीत्यिक मानधन योजनेमधील लाभार्थ्यांना मानधन थेट अदा करण्यात येते.

मुंबई, जालना, लातूर, परभणी, बुलढाणा या जिल्ह्यातील एकूण पात्र लाभार्थी ५३२३ इतके असून त्यापैकी ४६६५ इतके कलावंतांची डीबीटी अंतर्गत नोंदणी पूर्ण झालेली आहे. या कलावंतांना नियमित मानधन अदा करण्यात येते.

तथापि, उर्वरित कलावंत ६५८ यांची वैयक्तिक आधार पडताळणी व बँक सिंडीग न झाल्यामुळे मानधन अदा करण्यात आले नाही. सदर वैयक्तिक आधार पडताळणी व बँक सिंडीग कालवंत यांच्याकडून झाल्यावर त्यांना मानधन देण्यात येईल.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर विषयाच्या अनुषंगाने माझ्या अध्यक्षतेखाली दि. २४.०४.२०२६ रोजी सर्व संबंधित जिल्हाधिकारी व संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये ज्या कलावंताना तांत्रिक बाबीमुळे मानधन प्राप्त होण्यात अडचणी येतात. सदर अडचणी सोडवणूक करुन मानधन सुरु होण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

पात्रतेचे निकष अधिक सुलभ व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने मानधन योजना इतर बाबीचा विचार करुन योजनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात होत असलेल्या जलप्रदुषणास आळा घालण्याबाबत

**(२५) * ३२४१२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलप्रदूषण ही गंभीर पर्यावरणीय समस्या बनली असून त्याचा प्रतिकूल परिणाम नद्या, तलाव, धरणे, खाड्या, भूजल तसेच किनारी भागांवर होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पाण्यात औद्योगिक सांडपाणी, प्रक्रिया न केलेले किंवा अपुरी प्रक्रिया केलेले सांडपाणी, शेतीमधून वाहून जाणारी रासायनिक खते व किटकनाशके, गृहसंकुले व विकास प्रकल्पांमधून सोडले जाणारे सांडपाणी व घनकचरा यामुळे राज्यात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यापैकी केवळ सुमारे ५१.३ टक्के सांडपाण्यावरच प्रक्रिया होत असून उर्वरित सांडपाणी विविध जलस्रोतांमध्ये मिसळत जलप्रदूषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील जलजन्य रोगांमध्ये वाढ, मातीच्या गुणवत्तेचा ऱ्हास, जैवविविधतेला धोका, मत्स्यसंपदेचे नुकसान तसेच सोलापूर येथील उजनी जलाशय, सिद्धेश्वर तलाव, धर्मवीर संभाजी तलाव, पंढरपूर

येथील यमाई तलाव, कल्याण येथील देसाई खाडी आदी जलस्रोतांच्या पर्यावरणीय संतुलनावर विपरित परिणाम होऊन मासे मृत्युमुखी पडल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथील औद्योगिक केंद्रांमधून प्रक्रिया न केलेले सांडपाणी व औद्योगिक कचरा थेट भीमा नदीद्वारे उजनी जलाशयात मिसळत असून पाण्यात लोह, मँगनीज, शिसे, कॅडमियम आणि पारा यांसारख्या जड धातूंचे प्रमाण वाढल्यामुळे मानवी आरोग्यास कर्करोग व मज्जासंस्थेच्या गंभीर आजारांचा धोका निर्माण झाला असून धरणातील पाण्याची पातळी सर्वाधिक अल्कधर्मी (pH ९.०५) झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांतील प्रदूषण पातळी, संबंधित उद्योगांकडून होणारे प्रदूषण, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता तसेच जलप्रदूषण रोखणे तसेच पर्यावरणीय व सार्वजनिक आरोग्य संरक्षणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) राज्यामध्ये एकूण १,३४,११६ इतके उद्योग कार्यरत असून त्यापैकी औद्योगिक सांडपाणी निर्माण करणाऱ्या उद्योगांची संख्या ९,८९१ इतकी असून सदर उद्योगांतून प्रतिदिन ३,५०६ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होते. राज्यातील सर्व जल प्रदूषणकारी उद्योगांनी प्राथमिक/ द्वितीय/ तृतीय स्वरूपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविलेली आहे. उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविल्याची खात्री केल्यानंतरच संबंधित उद्योग सुरू करण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र देण्यात येते.

उद्योगातून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी राज्यात २६ सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (सी.ई.टी.पी.) उभारण्यात आल्या असून त्याद्वारे एकूण २२३.८५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.

राज्यातील ४२३ स्थानिक स्वराज्य संस्था व ७ कटक मंडळामधून एकूण ९,२७०.८ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्याची निर्मिती होत असून सद्य:स्थितीत त्यापैकी ५,०२३.८५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उर्वरित ४,२४६.९५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता ५,६५० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे काम सुरू आहे.
(३) सोलापूर येथील सिद्धेश्वर तलावात मासे मृत पावल्याची घटना माहे मे, २०२५ व माहे फेब्रुवारी, २०२६ च्या सुमारास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आलेली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली. व सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सोलापूर महानगरपालिकेस दि.१३/०६/२०२५ रोजी प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले होते.

सोलापूर येथील छत्रपती संभाजी (कंबर) तलावात मासे मृत पावल्याची घटना माहे मे, २०२५ च्या सुमारास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली व सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सोलापूर महानगरपालिकेस दि.२६/०५/२०२५ रोजी समजपत्र बजावण्यात आले होते.

तसेच माहे एप्रिल, २०२६ च्या सुमारास यमाई तलाव, पंढरपूर येथे मासे मृत पावल्याची घटना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात आली व सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद व पंचायत समिती, पंढरपूर यांना दि.०६/०४/२०२६ रोजी समजपत्र बजावण्यात आले आहे.

सहायक आयुक्त (मत्स्यव्यवसाय), सोलापूर यांच्या दि.१२/०६/२०२६ रोजीच्या अहवालानुसार सिद्धेश्वर तलाव व यमाई तलाव या तलावाच्या पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्याने मासे मृत पावल्याचे दिसून आले आहे.

(४) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मुख्यत्वे पुणे जिल्हयातील औद्योगिक वसाहती व पुणे महानगरपालिका यांचा समावेश होतो. राज्यातील कोणत्याही उद्योगांना प्रक्रियाकृत अथवा अप्रक्रियाकृत सांडपाणी नदीमध्ये सोडण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत परवानगी देण्यात येत नाही.

उजनी धरणाच्या पाण्याच्या पृथ:करण अहवालानुसार लोह व मँगनीज या घटकांचे सरासरी प्रमाण विहित मर्यादेत असल्याचे तसेच शिसे, कॅडमियम व पारा या घटकांचे सरासरी प्रमाण अत्यंत कमी प्रमाणात आढळल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे. उजनी धरणाच्या सन २०२५ व २०२६ या वर्षात घेतलेल्या नमुन्यांचा सामु (pH) सरासरी अनुक्रमे ८.५ व ८.३४ इतका असून जास्तीत जास्त ८.९ इतका नोंदविला गेला असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचे दि. १५/०६/२०२६ रोजीच्या अहवालानुसार सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात व उजनी धरणाच्या परिसरात जलजन्य आजाराची साथ अथवा रोगाचा प्रादुर्भाव झालेला असल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या निदर्शनास आले नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राज्यातील उद्योगांना प्रक्रियाकृत अथवा अप्रक्रियाकृत सांडपाणी नदीमध्ये सोडण्याची परवानगी देण्यात येत नाही. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदूषणकारी उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन त्यांच्या सांडपाण्याची गुणवत्ता तपासली जाते व प्रदूषणाचे प्रमाण मानकांपेक्षा जास्त आढळल्यास दोषी उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ नुसार कारवाई करण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत माहे मे, २०२६ पर्यंत एकूण २५५ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, ८४९ उद्योगांना प्रस्तावित निर्देश, ३१९ उद्योगांना अंतरिम निर्देश व ४७ उद्योगांना उत्पादन बंदीचे निर्देश बजावण्यात आलेले आहेत.

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सांडपाणी व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनासाठी भांडवली खर्चातून २५ टक्के रक्कम राखीव ठेवून याच कारणासाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारून अद्ययावत करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सन २०२४ ते सन २०२६ या कालावधीत एकूण ४७ स्थानिक स्वराज्य संस्थांना कारणे दाखवा नोटीस, ७६ स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रस्तावित निर्देश व १९ स्थानिक स्वराज्य संस्थांना अंतरिम निर्देश बजावण्यात आले आहेत.

राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन/ पुनरुज्जीवन करण्यास्तव नियामक आणि विकासात्मक दोन्ही कार्ये एकत्रित करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय क्र.नमुप्रा-२०२५/प्र.क्र.३२/तां.क.३, दि.२७/०४/२०२६ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील पोलिसांविरुद्धच्या तक्रारी, कोठडीतील मृत्यू आणि मानवी हक्क उल्लंघनाच्या वाढत्या घटनांबाबत**

**(२६) * ३२३८९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२३ ते २०२४ या कालावधीत पोलिसांविरुद्ध एकूण ५,३४२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी केवळ १,०३४ प्रकरणांमध्ये एफआयआर (FIR) नोंदवण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सन २०२३ मध्ये एकूण ११ कोठडीत मृत्यू झाले असून हे सर्व मृत्यू संबंधित व्यक्तींना न्यायालयात हजर करण्यापूर्वीच झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याच काळात विविध आंदोलनांमध्ये पोलिसांनी ३५ वेळा लाठीमार केल्यामुळे सुमारे १३७ नागरिक जखमी झाले असून, पोलिसांविरुद्ध बनावट चकमक, छळ आणि बेकायदेशीर अटकेसारखे मानवी हक्क उल्लंघनाचे गंभीर आरोप झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण समाधानकारक असले तरी, ९५% प्रलंबित खटल्यांमुळे कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी भरले असल्याचे वास्तव निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी व पोलिसांना मानवी हक्कांचे प्रशिक्षण देण्यासाठी तसेच गर्दी नियंत्रणाच्या आधुनिक पद्धती अंमलात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात सन २०२३ ते २०२४ या कालावधीत पोलिसांविरुद्ध एकूण १०,१२३ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्यावर संबंधित पोलीस घटक/पोलीस तक्रार प्राधिकरण यांचेकडे प्राप्त तक्रारींवर चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध ३७१ प्रकरणांत FIR नोंदविण्यात आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) राज्यात सन २०२३ मध्ये एकूण १७ कोठडीतील मृत्यू झाले असून त्यापैकी १२ व्यक्तींचा न्यायालयात हजर करण्यापूर्वी मृत्यू झालेला आहे.

पोलीस कोठडीतील मृत्यूच्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग/गुन्हे शाखा, गु.अ.वि. यांचेकडून केली जाते.
(३) राज्यात आंदोलनांमध्ये पोलिसांनी लाठीमार केल्यामुळे सन २०२३ मध्ये ०२ घटनेत २० नागरिक जखमी झाले आहेत. तसेच सन २०२४ मध्ये कोणीही नागरिक जखमी झाले आहेत असे तपासात आढळून आले नाही.

पोलिसांविरुद्ध बनावट चकमक, बेकायदेशीर अटकेसारखे मानवी हक्क उल्लंघनाचे आरोप झालेले नाहीत. सन २०२३-२०२४ या काळात छळ या प्रकरणी १ आरोप झालेला आहे.
(४) व (५) राज्यातील कारागृहांची अधिकृत क्षमता २७,५०३ इतकी असून, माहे मे, २०२६ अखेर कारागृहांत ३९,१३५ इतके प्रत्यक्ष कैदी आहेत. तथापि, या कैद्यांमध्ये ६,३२८ इतके सिध्ददोष (Convicted) व ३२,८०७ इतके न्यायाधीन कैदी (Under trial) आहेत.

कारागृहांची क्षमतावृद्धी करण्यासाठी राज्यात ८ नवीन कारागृहे व अस्तित्वातील कारागृहात नवीन बॅरेक्सचे बांधकाम करण्यात येत असून त्यामुळे १५,८५१ एवढी अतिरीक्त क्षमता निर्माण होत आहे.

तसेच केंद्र शासनाच्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) मधील नवीन तरतुदींनुसार खटले जलद चालविले जाणार आहेत. त्यामुळे कारागृहातील न्यायाधीन कैद्यांची (Under trial) संख्या कमी होण्यास मदत होत आहे.

पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दि.१३.०९.२०२१ परिपत्रक अन्वये पोलीस कोठडीतील आरोपीची सुरक्षा, आरोग्य व जिविताची जबाबदारी त्यास अटक करणारा अधिकारी, तपास अधिकारी, ठाणे अंमलदार यांचेवर टाकण्यात येऊन पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी घ्यावयाच्या

दक्षतेबाबत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना निर्देश देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील घरगुती ग्राहकांसाठी वीजदराची पारदर्शकता व दर निश्चितीबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्याबाबत

**(२७) * ३४९५६ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घरगुती वीज ग्राहकांच्या दरांबाबत महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) माहे मार्च, २०२६ मध्ये दिलेल्या आदेशावरून ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीकडून वीजदरांची तुलना माहे मार्च, २०२५ च्या मूळ आदेशाऐवजी मागील वादग्रस्त माहे जून, २०२५ च्या आदेशाशी करून दर कमी झाल्याचा दावा केला जात असून, याद्वारे स्थापित नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज तज्ज्ञांच्या मते २०० ते २,५०० युनिट वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांच्या देयकात ६ टक्के ते २१.५२ टक्क्यांपर्यंत वाढ होणार असल्याने सर्वसामान्य वीज ग्राहकांवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनतरही सध्या महावितरणकडून माहे जून, २०२५ च्या जुन्या आदेशानुसारच देयके आकारली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून यामुळे ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने वीजदराच्या मोजणीत व तुलनात्मक माहितीमध्ये सुसूत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा. आयोगाने दि. २५ मार्च, २०२६ रोजी वीज दर आदेश (प्र.क्र.७५/२०२५) जारी केले आहे. सदर वीजदर आदेशाद्वारे, मा. आयोगाने घरगुती वर्गवारीसाठी सरासरी वीजदरात आ. व. २०२४-२५ च्या तुलनेत आ. व. २०२६-२७ ते आ. व. २०२९-३० पर्यंत ३.००% ते १४.००% पर्यंत ची घट मंजूर केली आहे. त्याचप्रमाणे स्मार्ट मीटरचा पर्याय निवडणाऱ्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांकरीता आर्थिक वर्ष २०२६-२७ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत सौर तासांदरम्यान वीज वापरासाठीच्या दरात ८५ पैसे/युनिट ते रु. १.००/युनिट पर्यंतची सवलत मा. आयोगाद्वारे मंजूर करण्यात आली आहे.

तसेच, रुफटॉप सौर यंत्रणा असलेल्या निवासी ग्राहकांना टीओडी मीटर/स्मार्ट मीटर बसविल्यानंतर नक्त मापन अंतर्गत लाभ मिळणे चालू राहील. दिवसाच्या कोणत्याही तासा दरम्यान निवासी ग्राहकांना त्यांनी उत्पादित

केलेल्या व महावितरणकडे जमा असलेल्या ऊर्जेचा वापर करण्यास कोणतेही बंधन असणार नाही. शिवाय, सौर ऊर्जेच्या समायोजनानंतर निव्वळ वापराची देयक आकारणी सामान्य टेलिस्कोपिक वीज दरानुसार आकारण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

माहे मार्च, २०२५ च्या मूळ आदेशामधील त्रुटी व त्याच्या महावितरण वर होणारा प्रतिकूल परिणाम लक्षात घेऊन मा. आयोगाद्वारे दि. ०२ एप्रिल, २०२५ रोजीच्या अंतिम आदेशाद्वारे माहे मार्च, २०२५ च्या आदेशाला स्थगिती देऊन व अंतिम आदेशापर्यंत आ. व. २०२४-२५ करिता लागू असणाऱ्या वीज दरांनुसार वीज बिल आकारण्यास परवानगी देण्यात आली होती. मा. आयोगाने माहे जून, २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे, मार्च, २०२५ रोजी च्या आदेशामधील त्रुटी दूर करून नव्याने आदेश जारी केले होते. तद्नंतर मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व नियामक प्रक्रिया अवलंब करून मा. आयोगाद्वारे दि. २५ मार्च, २०२६ रोजी वीज दर आदेश जारी करण्यात आले आहे. या कारणास्तव माहे मार्च, २०२५ चे वीजदर आदेश कधीही लागू नव्हते त्यामुळे नवीन वीजदरांची तुलना माहे मार्च, २०२५ च्या वीजदरांशी करणे योग्य नाही. दि. २५ मार्च, २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे महावितरणातील सर्व वर्गवारीतील ग्राहकांचे आ.व. २०२४-२५ च्या तुलनेत आ. व. २०२६-२७ ते आ.व. २०२९-३० पर्यंत सरासरी वीज दरात कपात मंजूर केली आहे.

त्यामुळे, सदर आदेशाद्वारे, स्थापित नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत, मा. आयोगाने दि. २५ मार्च, २०२६ रोजी दिलेल्या आदेशान्वये आ.व. २०२४-२५ च्या तुलनेत आ.व. २०२६-२७ ते आ.व. २०२९-३० या कालावधीत घरगुती ग्राहकांच्या सरासरी वीजदरात घट मंजूर केली आहे. त्यानुसार, सदर आदेशाद्वारे १ ते १०० युनिट्स वापरणाऱ्या घरगुती ग्राहकाचा सरासरी वीज दरात १२.७७ % ते २६.२९% पर्यंत घट, १०१ ते ३०० युनिट्स वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचा सरासरी वीज दरात २.१९% ते ४.६१% पर्यंत घट, तसेच ३०१ ते ५०० युनिट्स वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचा सरासरी वीज दरात २.४१% ते ८.०४% पर्यंत घट व तसेच ५०० युनिट्सपेक्षा अधिक वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचा सरासरी वीज दरात ०.४७% ते ३.९५% पर्यंत घट निश्चित करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, स्मार्ट मीटरचा पर्याय स्वीकारणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी आ.व २०२६-२७ ते आ.व २०२९-३० या कालावधीत सौर तासांदरम्यान वीज वापरासाठीच्या दरात ८५ पैसे प्रति युनिट ते रु. १.०० प्रति युनिट इतकी सवलत मा. आयोगाने मंजूर केली आहे. या सर्व सवलतीचा एकत्रित विचार करून व ग्राहकांनी त्यांचे वीज वापराचे योग्य नियोजन केल्यास त्यांच्या वीज देयकात लक्षणीय प्रमाणात घट होऊ शकते.

त्यामुळे, २०० ते २.५०० युनिट वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांच्या देयकात ६ टक्के ते २१.५२ टक्क्यांपर्यंत वाढ होणार असल्याने सर्वसामान्य वीज ग्राहकांवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(४) हे खरे नाही.

मा. उच्च न्यायालयानी दि. ३ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे माहे जून २०२५ चा वीजदर आदेश रद्द केला असला तरी सदर आदेशाची योग्यता मा. सर्वोच्च न्यायालय समोर तपासणीसाठी मा. उच्च न्यायालयाने आपल्याच आदेशाला ४ आठवड्याची स्थगिती दिली होती. तद्नंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रथम दि. १७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे मा. आयोगाला १२ आठवड्यांची व त्यानंतर दि. २ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या आदेशाद्वारे दुसऱ्यांदा १२ आठवड्यांची मुदत देऊन सर्व नियामक प्रक्रियाचे अवलंब करून आदेश जारी करण्याचे निर्देश दिले होते.

त्यामुळे सदर कालावधीत सुद्धा मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांच्याच आदेशानुसार महावितरणातील ग्राहकांना माहे जून, २०२५ च्या आदेशानुसारच वीज बिले आकारण्यात आले. सद्यस्थितीत नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन करून व सर्व नियामक प्रक्रियाचे अवलंब करून मा. आयोगाने दि. २५ मार्च, २०२६ रोजी आदेश जारी केले आहे. सदर आदेशाद्वारे माहे जून, २०२५ रोजी दिलेल्या आदेशामधील मंजूर वीज दर कायम ठेवण्यात आले आहे व त्यानुसारच महावितरणकडून वीज दराची आकारणी करण्यात येत आहे.

त्यामुळे, सद्य:स्थिती आकारण्यात येणारे वीजदर हे कायद्याच्या तरतुदींनुसार तसेच सक्षम न्यायालये व मा. आयोगाने दिलेल्या आदेशांनुसारच असून त्याची अंमलबजावणी ही मा. आयोग, मा. उच्च न्यायालय आणि मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशांचे पूर्ण पालन करून करण्यात आली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये संगीत रजनी कार्यक्रमात ड्रग्जच्या अतिसेवनामुळे विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

**(२८) * ३२३७४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये 'नेस्को' आणि 'इन्स्पायरिंग टाय प्रोडक्शन' यांच्या वतीने आयोजित पाश्चात्त्य संगीत कार्यक्रमात (techno event / डीजे कॉन्सर्ट) अंमली पदार्थांच्या (एमडी / एक्स्टसी टॅबलेट) अतिसेवनामुळे (ओव्हरडोस) जमुनालाल कॉलेजमध्ये एमबीए शिकणाऱ्या दोन तरुण विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून अनेक तरुण-तरुणींना याचा गंभीर त्रास झाल्याची घटना दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमासाठी एका पासची किंमत रुपये १ लाख ते ३ लाख एवढी असताना सुरक्षा, वैद्यकीय सुविधा व अंमली पदार्थ प्रतिबंधक यंत्रणा अपुरी असल्याचे आणि कुरिअरच्या माध्यमातून कार्यक्रमस्थळी हजारो तरुणांना रुपये १,५०० ते २,००० मध्ये ड्रग्जच्या गोळया खुलेआम विकण्यात आल्या, तसेच "श्री.आनंद पटेल" नावाच्या कथित विकासकाने व श्री. रौनक खंडेलवाल याने कुरिअरच्या माध्यामातून या अंमली पदार्थांचा पुरवठा केला असल्याची बाब पोलीस तपासात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मुंबई पोलीस व नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (NCB) विदेशातून विमानतळावर उतरलेल्या महेश नावाच्या संशयित आंतरराष्ट्रीय तस्कराला ताब्यात घेतले असून मुंबई व भिवंडी परिसरात क्रिकेट साहित्यामध्ये लपवून आणलेले कोकेन जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांसह ग्रामीण भागातही कुरिअर कंपन्या व बेरोजगार तरुणांचा वापर करुन रिसॉर्ट्स, पब, क्लब आणि कॉन्सर्ट्सच्या नावाने "रेव्ह पार्ट्या व ड्रग्ज पुरवठ्याचे जाळे वेगाने पसरत असून शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे जीवन उद्ध्वस्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, उक्त कार्यक्रमांच्या आयोजकांसह सदर कार्यक्रमांना परवानगी देणाऱ्या यंत्रणा आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह हाय-प्रोफाईल संगीत कार्यक्रमांवर, रेव्ह पार्ट्यांवर पूर्णपणे बंदी घालण्यासाठी किंवा तेथे अनिवार्य ड्रग्ज स्कॅनिंग, विशेष तपास पथके तैनात करण्यासाठी आणि राज्यातील महाविद्यालयीन युवकांना लक्ष्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ वितरण साखळयांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.११.०४.२०२६ रोजी नेस्को प्रदर्शन केंद्र, नेस्को हॉल क्र.०५, गोरेगाव (पुर्व), मुंबई या ठिकाणी आयोजीत केलेल्या म्युजिक कॉन्सर्ट शो मध्ये अंमली पदार्थाच्या सेवनामुळे एका २४ वर्षीय तरुणीचा व २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू, २५ वर्षा खालील व्यक्तींना दारु देणे तसेच पोलीसांच्या परवानगी पेक्षा जास्त वेळ कार्यक्रम चालू ठेवल्याबाबत सदर कार्यक्रमामध्ये अंमली पदार्थ पुरवणाऱ्या एका व्यक्तीवर,नेस्को कार्यक्रमाचे आयोजक, इव्हेंट ऑर्गनायजर व त्यांचे साथीदार यांच्याविरुद्ध वनराई पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.२२८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०५, १२५, १२५(ब), २२३(ब), ३(५), महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ सह एनडीपीएस कायदा कलम ८(क), २२, २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी कुरिअरच्या माध्यमातून हजारो तरुणांना रुपये १५०० ते २००० किंमतीत ड्रग्जच्या गोळ्या खुलेआम विक्री होत असल्याबाबत तपासात आढळून आलेले नाही.

तथापि, सदर गुन्ह्यातील अटक आरोपी याने कुरिअर मार्फत अंमली पदार्थ मागवून ते इतर अटक आरोपी यांच्या मार्फत मयत विद्यार्थ्यांना दिले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी आनंद पटेल व रौनक खंडेलवाल यांना अटक करण्यात आली आहे.

(३) उपरोक्त गुन्ह्यातील पाहिजे आरोपी "महेश खेमलानी" हा घटना झाल्यानंतर भारता बाहेर फरार झाला होता. सबब, त्याची लुक आऊट नोटीस काढून तो भारतात आल्यानंतर वनराई पोलीस ठाणे येथील पोलीस अधिका-यांनी सदर आरोपीस विमानतळावरून ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

नमूद गुन्ह्यात भिवंडी परिसरात क्रिकेट साहित्यामध्ये लपवून आणलेले कोकेन जप्त केल्याबाबत गुन्हा नोंद नाही.

(४) मुंबई, पुणे, ठाणे शहरामध्ये कुरिअर द्वारे अंमली पदार्थ पुरवठ्यासंदर्भात गुन्हे नोंद असल्याचे दिसून आले नाही. तथापि, नागपूर शहरामध्ये कुरिअरद्वारे अंमली पदार्थ पुरवठ्यासंदर्भात एक गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(५) नेस्को प्रदर्शन केंद्र, गोरेगाव येथे दि.११.०४.२०२६ रोजी झालेल्या म्युझिक कॉन्सर्ट कार्यक्रमाचे आयोजक यांचा नमूद गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना तात्काळ अटक करण्यात आली आहे.

तसेच उपरोक्त नमूद गुन्ह्यात अंमली पदार्थ पुरवणारा व्यक्ती, इव्हेंट ऑर्गनायजर व त्यांचे साथीदार असे एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत ३ आरोपी जामिनावर आहेत.

(६) सदर घटनेच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी नेस्को सेंटर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मोठ्या कार्यक्रामांदरम्यान पोलीस बंदोबस्त, साध्या वेशातील अधिकारी व अमंलदारांची नियुक्ती, संशयित व्यक्तींवर देखरेख तसेच आवश्यकतेनुसार तपासणी व गुप्त माहिती संकलन या सारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.

शासनाच्या अंमली पदार्थ तस्करी/ विक्रीबाबतच्या "Zero Tolerance" धोरणानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.२२.०८.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये अंमली पदार्थाच्या गुन्ह्यामध्ये एन.डी.पी.एस.ॲक्ट अंतर्गत दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबतच्या सुचना राज्यातील सर्व पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या सन २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे संपूर्ण देशातून समूळ उच्चाटण करण्याच्या धोरणाच्या अनुषंगाने राज्याने "A Whole-of-Government Approach" विकसित केलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाची ही मोहिम राज्यातील विविध विभागांमध्ये समन्वय साधून गृह विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. त्याकरीता अवैध अंमली पदार्थांची शेती/लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालण्याबाबत व अंमली पदार्थाचा प्रसारावर आळा घालण्याकरीता व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राज्यामध्ये विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येत आहे.

मुंबई शहरात "ड्रग्ज फ्री मुंबई" अभियान राबवून अंमली पदार्थाचे सेवनाचे परिणांमाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम, सामुहिक शपथ कार्यक्रम, पथनाटय, आर्ट्स फेस्टीव्हल, मॅरेथॉनमध्ये सहभागी होवून, वाहन रॅली, बॅनर / हॅण्डबिल पत्रके वाटप करून, पोलीस ठाणे हद्दीतून रॅलीचे आयोजन करण्यात येते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**प्रशांत महासागरातील एल निनोच्या प्रभावामुळे राज्यातील संभाव्य चारा टंचाईबाबत**

**(२९) * ३२५९६ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशांत महासागरातील एल निनो या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे राज्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला असून संभाव्य चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे जिल्हा नियोजन मंडळातून आठ ते दहा कोटी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी पशुसंवर्धन विभागाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वैरण विकास कार्यक्रमासाठी सुमारे रु.५२.९४ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला होता मात्र यंदा संभाव्य दुष्काळामुळे अतिरिक्त निधीची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पार्श्वभूमीवर शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतर्गत रुपये २०० कोटी इतका वैरण विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वैरण विकास कार्यक्रमांतर्गत चारा पिकांच्या बियाणांचे वितरण, त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद तसेच महाबीजमार्फत बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठीची दिर्घकालीक योजना आहे. यामध्ये वैरण विकास कार्यक्रमाचाही समावेश आहे.
(४) एल निनो" (E१ Nino) च्या प्रभावामुळे राज्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा होण्याची शक्यता व त्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वैरण विकास कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान ८ ते १० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची तसेच आवश्यकता भासल्यास अधिक निधीची तरतूद करण्याबाबत दिनांक २१ एप्रिल, २०२६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविले आहे. त्यानुसार आवश्यक तो निधी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल. चारा पिकासाठी महाबीज, राष्ट्रीय बियाणे मंडळ व इतर बियाणे यांच्याकडे चारा बियाणांची मागणी करण्यात आली असून जिल्हानिहाय मागणीनुसार पशुपालकांना चारा बियाणे वितरीत करण्यात येईल. याशिवाय विकसित भारत रोजगार आणि आविजिका मिशन (ग्रामीण) VB-G RAM G २०२५ अंतर्गत जनावरांना सकस दर्जेदार व पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध व्हावा यासाठी वैरण विकासाच्या दृष्टिने रोजगार हमी योजना विभागाशी संसाधन अभिसरण (resource convergence) करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील बॉयलर दुर्घटनेबाबत

**(३०) * ३३१४९ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्रमांक १० मध्ये देखभाल व दुरुस्तीच्या कामादरम्यान बॉयलरमधून उसळलेल्या गरम पाण्याच्या वाफेमुळे तीन अभियंत्यांसह आठ कर्मचारी व कंत्राटी कामगार जखमी झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीही कोराडी वीज केंद्रात अशाच प्रकारच्या दुर्घटना घडून कामगारांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुर्घटनेच्या वेळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना, सुरक्षा उपकरणे व कार्यपद्धतीचे पालन करण्यात आले आहेत काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुर्घटनेतील जबाबदार अधिकारी/कंत्राटदारांवर कारवाई करण्यासह भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, कोराडी औष्णिक वीज केंद्र ६६० मेगावॅट संच क्र. १० बंद असताना दिनांक १३.०४.२०२६ रोजी क्लिंकर पाडत असताना बॉयलर मधील पिप होल मधून गरम वाफ बाहेर आल्याने ८ जणांना दुखापत झाली.

(२) सदर अपघातात ८ जण जखमी झाले असून, त्यापैकी ४ जण महानिर्मितीचे अधिकारी/ कर्मचारी व ४ जण कंत्राटी कामगार आहेत. सर्व जखमींना तात्काळ जवळच्या मॅक्स मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल, नागपूर येथे दाखल करण्यात आले व आवश्यक उपचारानंतर सर्व जखमींना रूग्णालयातून सोडून देण्यात आले आहे.

सदर कर्मचाऱ्यांनी काम करत असताना सेफ्टी शूज, सेफ्टी गॉगल्स, सेफ्टी हेल्मेट परिधान केलेले होते. परंतु क्लीन्कर पाडत असताना अचानक राखेची गरम वाफ पीप होल मधून बाहेर आल्याने सदरची घटना घडली. तथापि, सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता संचाच्या पिप होल जवळ संच बंद असताना देखील काम करत असताना अतिरिक्त विशेष सुरक्षा खबरदारी बाळगण्यासाठी फेस शिल्ड, बॉयलर सूट, मास्क इत्यादी चा वापर करणे आणि SOP चे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(३) सदर अपघाताचे सुरक्षा विभागामार्फत करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिट नुसार सुरक्षा नियमांचे कोणतेही उल्लंघन झाल्याचे आढळून आलेले नाही. जखमी कंत्राटी कामगार कर्मचारी हे राज्य विमा योजनेचे लाभार्थी असून सदर कंत्राटी कामगारांना विशेष उपचार मिळण्याकरिता महानिर्मिती कोराडी औष्णिक विद्युत केंद्राद्वारे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच कर्मचारी राज्य विमा योजने अंतर्गत आर्थिक लाभ व इतर सुविधा सदर कंत्राटी कामगारांना अदा करण्यात येईल.

(४) सदर संपूर्ण प्रक्रिया विनाविलंब पार पाडण्यात आली.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिलांचे होणारे लैंगिक व आर्थिक शोषण रोखण्यासह जादूटोणाविरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याबाबत

**(३१) * ३२४७४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भोंदू श्री.अशोक खरात प्रकरणानंतर अवघ्या एका महिन्यांत पोलिसांनी राज्यभरातल्या १६ भोंदू बाबांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध विविध ठिकाणी गुन्हे दाखल केले असताना नाशिक येथील भोंदू श्री.अशोक खरात प्रकरण, नाशिक शहरातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपनी, परतवाडा (जि. अमरावती), राळेगाव-पांढरकवडा (जि. यवतमाळ), पुणे, मालाड (मुंबई) येथे महिलांचे लैंगिक शोषण व अत्याचार झाल्याची अनेक प्रकरणे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.अशोक खरात यांच्याविरुद्ध नाशिक आणि अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यांत लैंगिक छळ, जमीन बळकावणे, आर्थिक गैरव्यवहार आणि जादूटोणा करून फसवणूक करणे यांसारखे एकूण १२ गुन्हे दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर श्री.अशोक खरात प्रकरणाच्या तसेच राज्यभरात निदर्शनास आलेल्या इतर सर्व प्रकरणांच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सदर तपास जलद गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील महिलांचे होणारे लैंगिक व आर्थिक शोषण रोखण्यासाठी व 'महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्याची' कडक व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) अशोक खरात यांच्याविरुद्ध नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत लैंगिक छळ, जमीन बळकावणे, आर्थिक गैरव्यवहार आणि जादूटोणा करून फसवणूक करणे यांसारखे एकूण १७ गुन्हे दाखल झालेले आहेत.
(३) अशोक खरात भोंदूबाबा प्रकरण, नाशिक शहरातील बहुराष्ट्रीय कंपनीमधील कर्मचाऱ्यांवरील अत्याचार प्रकरण व परतवाडा (जि. अमरावती) येथील महिला अत्याचार प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना करण्यात आली आहे.
(४) अशोक खरात विरुद्ध दाखल १२ गुन्ह्यांचे तपास विशेष तपास पथकाकडे (SIT) वर्ग करण्यात आले असून महिलांवरील लैंगिक अत्याचारासंबंधी ८ गुन्ह्यांचा तपास पुर्ण करुन दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आलेले आहेत. तसेच, इतर ४ आर्थिक फसवणूकीसंबंधित गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

नाशिक शहरातील बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये झालेल्या महिला अत्याचार प्रकरणी पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत देवळाली कॅम्प पोलीस ठाणे व मुंबईनाका पोलीस ठाणे येथे दाखल एकूण ९ गुन्ह्यांच्या तपासाकरिता विशेष तपास पथक गठीत करण्यात आले असून आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

परतवाडा (जि. अमरावती) येथील महिला अत्याचार प्रकरणी गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष तपास पथक गठीत करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यामध्ये एकूण ८ आरोपींना अटक करण्यात येऊन आरोपींविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३ राज्यात लागू असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे भारतातले पहिले राज्य आहे. सदर कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सामाजिक न्याय विभागाच्या वतीने विभागीय स्तरावर व जिल्हास्तरावर जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील विविध शहरांमध्ये एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीबाबत

**(३२) * ३३८८८ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शहरांमध्ये 'टॉक्सिक्स लिंक' (Toxics Link) या स्वयंसेवी संस्थेच्या अलीकडील सर्वेक्षणानुसार, मुंबईतील ८५% सर्वेक्षणांच्या ठिकाणी बंदी असलेले एकल वापर प्लास्टिक (Single-Use Plastic) अजूनही वापरले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) त्याचप्रमाणे, राज्यात हॉटेल आणि चहाच्या टपऱ्यांवर प्रतिबंधित प्लास्टिक व कागदी कपांचा सर्रास वापर होत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने सन २०२१ मध्ये अधिसूचित केलेल्या प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमानुसार सिंगल युज प्लास्टिकवर बंदी असतानाही त्याचे उघडपणे उल्लंघन होत असून राज्य शासनाने 'सिंगल-युज प्लास्टिक'वर बंदी घातलेली असतानाही, रेल्वे प्लॅटफॉर्म, मॉल्स, पर्यटन स्थळे आणि धार्मिक स्थळांच्या परिसरात हे प्लास्टिक मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्लास्टिक व कागदी कपांमधून चहा घेतल्याने कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत असूनही प्रशासनाकडून यावर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी करण्यात प्रशासन आणि संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असून स्थानिक नगरपरिषदेमार्फत प्लास्टिक पिशव्या व कप यांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पथके तयार करण्यात न आल्याने, दंडात्मक कारवाई थंडावली असल्याने बेकायदा प्लास्टिक विक्री व वापर फोफावला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपूर्ण प्रकारणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात येत आहे तसेच प्लास्टिकचा वापर कायमस्वरूपी रोखण्यासाठी दंडाच्या रकमेत वाढ करून प्रशासकीय पातळीवर कडक अंमलबजावणी करण्याकरिता शासन कोणत्या सुधारणा करीत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

टॉक्सिक्स लिंक (Toxics Link) या स्वयंसेवी संस्थेच्या अहवालात मुंबईमध्ये १४० ठिकाणी घेतलेल्या नमुन्यामधून ११९ ठिकाणी एकल प्लास्टिक आढळल्याचे नमूद केले आहे.
(२), (३) व (४) शासनाने दिनांक २३.०३.२०१८ रोजीच्या अधिसूचनेव्दारे प्लास्टिक कपावर बंदी घातलेली आहे. तसेच दिनांक १५.०७.२०२२ च्या सुधारीत अधिसूचनेनुसार प्लास्टिक लेपित कपांवर सुध्दा बंदी घालण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत धार्मिक स्थळांच्या ठिकाणी याबाबत विशेष जनजागृती मोहिम राबविण्यात येत असते. तसेच, एकल वापर प्लास्टिक निर्मुलनासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ विविध स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था व स्थानिक नागरिकांच्या सहभागाने जनजागृती मोहिम राबवत असते.
(५) व (६) महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्मोकॉल अधिसूचनेच्या आणि अंमलबजावणीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल विभाग, जिल्हा परिषद, संचालक आरोग्य सेवा, शिक्षण मंडळाचे संचालक, पर्यटन पोलीस आणि पोलीस विभाग, उपायुक्त पुरवठा, राज्य कर विभाग, परिक्षेत्र वन अधिकारी हे प्राधिकृत अधिकारी आहेत.

महाराष्ट्र प्लास्टिक अधिसूचना, २०१८ च्या अंमलबजावणी करिता स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत विविध विक्रते व आस्थापनांना दरमहा भेटी देत असतात. त्यानुसार एकल वापर प्लास्टिक विक्री व वापराबाबत तपासणी केली जाते व पाहणी दरम्यान आढळून आलेल्या दोषींवर महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई केली जाते.

महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६ नुसार दंड व शास्तीची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या अपराधासाठी दंड रुपये ५०००/-, दुसऱ्या अपराधासाठी दंड रुपये १०,०००/- व तद्नंतरच्या अपराधासाठी तीन महिन्याच्या कारावासाची व त्यासोबत रुपये २५,०००/- इतक्या दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार माहे एप्रिल, २०२५ ते माहे मार्च, २०२६ या कालावधीत एकूण १,७०,८८८ आस्थापनांची पाहणी करण्यात आली असून, त्यापैकी ५९३१ उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईपोटी एकूण रुपये २.०८ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला असून ७८.४७ मे. टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यात दिव्यांग शाळांचे नुतनीकरण प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * ३२६५७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १५० दिव्यांग अनुदानित शाळांचे नुतनीकरणाचा प्रस्ताव मागील तीन महिन्यांपासून दिव्यांग आयुक्तालय, पुणे यांच्याकडे प्रलंबित असल्याने सुमारे ३००० कर्मचाऱ्यांचे माहे एप्रिल, २०२६ महिन्याचे वेतन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आवश्यक असलेल्या शाळा, वसतिगृहे व पुनर्वसन केंद्राचे नुतनीकरण ऑनलाईन पोर्टलवर वेळेत पूर्ण होऊनही त्यावर अंतिम मंजूरी देण्यात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय दिरंगाईमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, पुनर्वसन व मूलभूत सुविधा बाधित होत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुतनीकरण प्रक्रियेसाठी पूर्वी निश्चित करण्यात आलेली ऑनलाईन प्रणाली प्रक्रियेत पारदर्शकता कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना नवीन नोंदणी प्रमाणपत्र हे शासनाच्या ई-ऑफीस प्रणालीद्वारे व शासन निर्णय दिनांक २८.०९.२०१६ अन्वये शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण देण्यात येत होते.

सद्य:स्थितीत दिव्यांग क्षेत्रातील संस्थांच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी शासनाने "महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टल" विकसित केले असून त्याद्वारे ऑनलाइन अर्ज स्वीकारले जात आहेत. पोर्टलमध्ये काही तांत्रिक अडचणी आढळल्याने त्याबाबत सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे. पोर्टल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईपर्यंत ई-ऑफीस प्रणालीद्वारे नुतनीकरण प्रस्तावांवर निर्णय घेण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत २७९ नुतनीकरण प्रस्तावापैकी २४९ इतके नुतनीकरण प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरित ३० नुतनीकरण प्रकरणे व जिल्हा समितीकडून प्राप्त होणारी प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अनुदानित दिव्यांग उपक्रमांतील मान्यताप्राप्त कर्मचाऱ्यांचे वेतन माहे जून, २०२६ पर्यंत अदा करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही. दिव्यांग क्षेत्रातील संस्थांच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी शासनाने "महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टल" विकसित केले असून त्याद्वारे ऑनलाइन अर्ज स्वीकारले जात आहेत.

"महाराष्ट्र दिव्यांग सहाय्यक पोर्टल" मधील तांत्रिक अडचणी येत असल्याने सदर त्रुटी दूर होईपर्यंत ऑफलाईन पध्दतीने नुतनीकरण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत २७९ नुतनीकरण प्रस्तावापैकी २४९ इतके नूतनीकरण प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरित ३० नुतनीकरण प्रकरणे व जिल्हा समितीकडून प्राप्त होणारी प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तार प्रकल्पाबाबत**

**(३४) * ३३२१४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तार प्रकल्पाचे भूमिपूजन दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ रोजी मा.पंतप्रधान यांच्या हस्ते करण्यात आले असून, दीड वर्ष उलटूनही प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ७,६०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प सध्या प्रशासकीय प्रक्रियेमुळे सरकारी पातळीवरील मंजुरीअभावी प्रलंबित आहे तसेच विमानतळाचे आधुनिकीकरण व संचालन जीएमआर समूह यांच्याकडे सोपवण्याची प्रक्रिया केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेस होत असलेली दिरंगाई दूर करून प्रत्यक्ष कामास गती देण्यासह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण व उन्नतीकरण यासंदर्भात मिहान इंडिया लि. (MIL) आणि GMR ग्रुप यांच्यात दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२४ रोजी सवलत करारनामा (Concession Agreement) करण्यात आला आहे. नागपूर विमानतळाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., नागपूर कडून ७८६.५६ हेक्टर व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्याकडून ५३४.१६ हेक्टर जमीन मिहान इंडिया लि., नागपूर यांना जमीन हस्तांतरित करावयाची आहे.

याअनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचेकडील जमीन जी.एन.आय.एल. (जीएमआर नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ) यांना हस्तांतरीत करणे तसेच जी.एन.आय.एल. कंपनी यांना विमानतळाचे संचालन करण्यास परवानगी देणे या बाबींकरिता केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता दिनांक १३ मे, २०२६ रोजी प्राप्त झाली आहे. त्यानुसार मिहान इंडिया लि.व्दारे जी.एन.आय.एल. यांना जमीन हस्तांतरण करावयाची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणांतर्गत मिहान इंडिया लि.यांना हस्तांतरीत करावयाच्या एकूण ७८६.५६ हेक्टर जमिनीपैकी पहिल्या टप्प्यात ७४७.७८ हेक्टर जमिनीचा ताबा भाडेपट्टा करार दिनांक १६ मे, २०२५ अन्वये मिहान इंडिया यांना देण्यात आला आहे. उर्वरित ३८.७८ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करुन हस्तांतर करण्यासंदर्भातील आवश्यक कार्यवाही पूर्ण झाल्यावर, सदर जमीन मिहान इंडिया लि. यांना हस्तांतरित करण्यात येईल. मिहान इंडिया लि.व्दारे सदर जमीन जी.एन.आय.एल. यांना देण्यात येईल.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.